म. ग्रं. सं. ठाणें.
विषय निबंध
सं. क्र. २५०७

# वैचारिक क्षण

★

लेखक :
रामचंद्र श्रीधर भागवत

★

REFBK-0022355

अभिनव प्रकाशन, मुंबई – ४०० ०१४.

निबंध
संग्रह

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

( कृ.मा.प.)

प्रकाशक :

**वामन विष्णु भट**, अभिनव प्रकाशन
५३ गुरु नानक मार्केट, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४

प्रथमावृत्ती :

१८ मार्च १९७८

मुद्रक :

**मनोहर गोपाळ प्रधान**, सेवक मुद्रणालय
३८९ सरस्वती निवास, अलिबाग-कुलाबा



रामचंद्र श्रीधर भागवत

जन्म : २९-७-१९०६

मृत्यु : १८-३-१९५२

## - छोटेसे निवेदन -

कैलासवासी रामचंद्र श्रीधर भागवत यांच्या 'माझे वैचारिक क्षण' या लेखांचे आज प्रकाशन होत आहे, ही एक आनंदाची गोष्ट आहे. आज ते हयात असते; तर एक आगळाच आनंद झाला असता !

हे त्यांचे अगदी शेवटचे लिखाण. हृदय विकाराने ते अल्पावधीत वारले नसते; तर ते अपुरे राहिले नसते; पण ...? तसे पाहिले तर त्यांच्या विचारांचा एक एक क्षण स्वतंत्रच वाटतो. म्हणूनच ते क्षण पुस्तकरूपाने वाचकांपुढे ठेवण्याचे मी धाडस करीत आहे. सूज्ञ व रसिक वाचकांकडून प्रतिसाद मिळावा ही अपेक्षा.

१८ मार्च १९७८ या त्यांच्या स्मृति-दिनी, त्यांची आठवण म्हणून ही लेखमाला पुस्तकरूपाने वाचकांपुढे ठेवण्याचे ठरविले. माझा हा संकल्प आज जो पूर्ण होत आहे तो श्री. जयंत व्ही. प्रधान व प्रकाशक श्री. वा. वि. भट यांच्या सहकार्यामुळेच. विशेषतः श्री. वा. वि. भट यांनी मनावर घेतले म्हणूनच कै. भागवतांचे 'वैचारिक क्षण' पुस्तक रूप घेऊ शकले.

या दोघांच्या साहाय्याबद्दल मी त्यांची अत्यंत ऋणी व आभारी आहे. या कामी ज्यांनी ज्यांनी मला वेळोवेळी प्रोत्साहन दिले, त्यांचेही या प्रसंगी आभार मानणे अप्रस्तुत होणार नाही. मी त्यांचीही आभारी आहे.

समाजातील धार्मिक व वेडगळ समजुतींचे व रूढींचे अंधानुकरण करणाऱ्या आजच्या तरुण पिढीला अंतर्मुख होण्यास या पुस्तकाची थोडीफार मदत झाल्यास, या पुस्तकाच्या प्रकाशनाचा हेतु सफल झाला असे मी समजेन.

विख्यात विचारवंत. श्री. नारायण देसाई यानी या छोटयाशा पुस्तिकेला पुरस्कार लिहून लिल्याबद्दल मी त्यांचीही फार ऋणी आहे.

दिनांक-१८ मार्च १९७८ श्रीमती कमल रामचंद्र भागवत

माधववाडी-दादर-

मुंबई ४०००१४

२२३५५
दा. क्र. निबंध
२५०१

# लेखकाचा अल्प परिचय

कैलासवासी रामचंद्र श्रीधर भागवत यांचा जन्म २९ जुलै १९०६ साली धावडशी या गावी झाला. धावडशी हे गाव साताऱ्यापासून पाच सहा मैलावर आहे. या गावी भार्गवरामाचे मंदिर असून मंदिरात ब्रह्मेन्द्र स्वामींची समाधी आहे. भागवत मंडळी याच गावची.

त्यांचे आईवडील व घरची मंडळी शेतीवाडी संभाळून याच गावी रहात. या गावी प्राथमिक शिक्षणाची सोय चांगली होती, त्यामुळे त्यांचे प्राथमिक शिक्षण याच गावी पार पडले. ते सर्वांत लहान म्हणून लाडके. त्यामुळे ते रोज मंदिराजवळील तळ्यात पोहण्यास जात व संध्याकाळी न चुकता आईबरोबर पुराणासही जात. वय लहान, खेळकर प्रवृत्ती यामुळे अभ्यासाकडे लक्ष बेताचेच असे. खेळकरपणाला खोडकरपणाची जोड असल्यावर अभ्यासात नेत्रदीपक प्रगती कशी असणार ?

ते इयत्ता चौथीची परीक्षा उत्तीर्ण झाले. साहजिकच पुढील शिक्षणाचा यक्ष प्रश्न घरच्या मंडळीपुढे उभा राहिला. विचाराअंती इतर नातेवाईकां-कडे ठेवण्यापेक्षा सोलापुरास मोठ्या बहिणीकडे पाठविल्यास शिक्षण व्यवस्थित पार पडेल आणि योग्य मार्गदर्शनही मिळेल म्हणून त्यांची रवानगी सोलापुरास करण्यात आली. तेथे ते आपल्या भाचाबरोबर 'नॉर्थ कोट हायस्कूलमध्ये' जाऊ लागले. तेथे ते फार दिवस राहिले नाहीत.

ते दिवस राष्ट्रीय चळवळीचे, नवीन पिढीला स्वावलंबी, स्वातंत्र्य-वादी व स्वदेशाभिमानी बनविणाऱ्या शिक्षण पद्धतीची नितांत गरज होती. ती कै. विष्णु गोविंद विजापुरकर यांनी तळेगावी 'नवीन समर्थ विद्यालय' नावाची आश्रम-पद्धतीवर सस्था काढून पूर्ण केली!. थोड्याच दिवसात हे मामा-भाचे या शाळेत येऊन दाखल झाले.

या संस्थेतील शिक्षकांचा त्याग, देशभक्ती व स्वाभिमान या गुणांचा आणि त्यांच्या करड्या शिस्तीचा त्यांच्या मनावर फार प्रभाव पडला. देशसेवेची, समाजोन्नत्तीची आणि करड्या शिस्तीची आवड याच संस्थेतील शिक्षणामुळे उत्पन्न झाली. पुढील सर्व प्रवृत्तींची पाया भरणो याच संस्थेत झाली.

ते तळेगावी असतानाच त्यांच्या प्रेमळ आईचा प्लेगच्या साथीने बळी घेतला. आईच्या मृत्यूनंतर आपला मुलगा नजरेसमोर असावा म्हणून त्यांच्या वडिलांनी साताराच्या 'न्यू इंग्लिश स्कूलमध्ये' त्यांना दाखल केले आणि राहाण्याची सोय नातेवाईकांकडे केली. याच शाळेतून ते मॅट्रिक झाले. त्यांचे विश्वविद्यालयीन शिक्षण पुणे व मुंबई येथे पार पडले.

शिक्षण संपताच ते १९३७ साली साताऱ्यास आले आणि त्यानी वकिलीच्या व्यवसायास प्रारंभ केला. व्यवसाय जरा मूळ धरू लागतो न लागतो तोच त्याना साताऱ्यास रामराम ठोकावा लागला. त्यांचे वडील बंधू वारल्यामुळे त्यांच्या घरची व्यवस्था पहाण्यास त्यांना अकोल्यास जावे लागले. परंतु ते तेथे रमले नाहीत. त्यांची स्वतंत्र वृत्ती त्याना तेथे चैन पडू देईना, मुंबई हेच आपले कार्यक्षेत्र ठरवून ते मुंबईस परतले.

लहानपणापासूनच त्याना वाचनाची व लेखनाची आवड होती. पुढे पुढे वाचनाची आवड वाढतच गेली. वाचनाचा प्रभाव इतका पडला की त्यांची मते, पुरोगामी व विचार प्रगल्भ झाले. लेखनाची आवड असल्याने त्यांनी आपला वेळ लेखन व्यवसायात घालविण्याचे ठरविले. त्यांनी थोड्या फार कविताही रचल्या. शिवाय गायन-वादन हे त्यांचे आवडते छंद !

समाजातील वाईट रीतिरिवाज आणि बुरसटलेले विचार एकाद्या जीर्ण वस्त्राप्रमाणे फेकून दिले तरच समाज प्रगत होईल ही त्यांची बंडखोर वृत्ती.

स्वातंत्र्य मिळविण्याकरिता लढा देणे, देशहिताकरिता धडपडणे, समाजास पुरोगामी विचारांचे व आचारांचे खत पाणी घालणे, या सारख्या ज्वलंत प्रश्नांनी त्यांचे मन घेरले होते. अशा मानसिक आंदोलनावस्थेत असतानाच रशियन राज्य-क्रांतीने त्याचे मन भारावून गेले. त्यांचे विचार व वाचन त्या घटनेच्या आधारे चालू झाले.

समाजक्रांती घडवून आणण्यास आणि समाजाचे मतपरिवर्तन करण्यास लेखनासारखे दुसरे प्रभावी शस्त्र नाही हे ठाम मत! याच माध्यमाद्वारे समाज-जागृति करण्याची इच्छा बळावली. त्यानी वृत्तपत्र व्यवसायात शिरण्याचे प्रयत्न चालू केले. त्यांचे काही लेख वृत्तपत्रातून प्रसिद्धही झाले. मते परखड आणि जहाल फार.

अकोल्याहून परतल्यावर ते सोलापुरास बहिणीकडे गेले. तेथील मुक्कामात त्यांनी '**माझी सुनंदा**' ही पुरोगामी व परखड विचारांची सामाजिक कादंबरी १९३९ साली लिहून हाता वेगळी केली. या विचार-मालिके नंतर तिचेही लवकरच प्रकाशन करण्याचा विचार आहे. 'भू-दान यज्ञाचे थोतांड,' 'तत्त्वनिष्ठ नि रणशूर कोरिया,' 'आदर्श गृहिणी,' 'गृहिणीबद्दलच्या माझ्या कल्पना' हे त्यांचे इतर स्फूट लेख. आपल्या तटस्थता धोरणासंबंधी लिहिलेली इंग्रजी पुस्तिकाही आहे.

या सर्व प्रयत्नात असतानाच १९३९ साल उजाडले. युरोपात जागतिक महायुद्धाचे वारे वाहू लागले. युद्धाची ठिणगी पडताच कै. भागवतांच्या बंडखोर वृत्तीने उचल खाल्ली आणि ते १९४० साली सैन्यात दाखल झाले. आघाडीवर असतानाच जमल्यास रशियात जाऊन तेथील सत्यपरिस्थितीचे परिशीलन करणे, स्वदेशहिताच्या दृष्टीने तेथील कोणत्या बाबींचा उपयोग होईल याची पाहणी करणे आणि जमल्यास परतताना पी. एच्. डी. ची पदवी संपादन करणे हा हेतु.

युद्धसमाप्तीनंतर त्यांची सातारा व कुलाबा जिल्ह्यात सरकारी वकील म्हणून कामगिरी-

त्यांच्या बंडखोर, शिस्तप्रिय, पुरोगामी विचारांचे आणि निस्पृहतेचे दर्शन अनेक प्रसंगांतून दिसून येते.

सैन्यात आघाडीवर असतानाच रंगूनचा पाडाव झाला. दोस्त सैन्याने रंगून शहराची लुटालूट करून धुमाकूळ घालायला सुरुवात केली. त्यावेळी कै. भागवत त्यांच्यामध्ये सहभागी न होता निवांतपणे रंगून विश्वविद्यालयात जाऊन वाचत बसत होते. तेथून परततांना अनेकांनी सोने, नाणे, मौल्यवान वस्तू व जडजवाहीर लूट म्हणून आणले. भागवतही या लुटीत

सामील झाले; आणि त्यानी Burmis Law आणि the Problems of metaphysics ही दोन पुस्तके आणली.

देव, धर्म, रूढी, कायदा व सामाजिक बंधनातील तांत्रिकतेविरुद्ध ते नेहमीच बंड पुकारीत. या तांत्रिक बंधनांपेक्षा स्वतःच्या मनाला व दिलेल्या शब्दाला ते फार मानीत. त्यामुळे नोंदणी पद्धतीने अगर धार्मिक विधीने विवाह करण्याची त्यांची तयारी नव्हती. या सर्वापेक्षा आपन दिलेल्या शब्दाला ते प्रमाण मानीत.

स्त्रियांच्या बाबतीतही त्यांची मते अगदी ठाम होती. आपल्या समाजजीवनात आणि घरात स्त्रीला स्वतंत्र अस्तित्व नाही याची त्यांना फार चीड होती. समाजात, घरात तिला स्वतंत्र अस्तित्व आणि मानाचे स्थान मिळण्यासाठी ती आर्थिक दृष्टचा स्वतंत्र आणि वैचारिक दृष्टचा स्वतंत्र नि प्रगल्भ झाली पाहिजे या मताचा ते सतत पुरस्कार करीत. तिचा सर्वांगीण विकास व्हावा आणि ती प्रगतिशील व्हावी याकरितां त्यांची सतत धडपड चालू असे. स्त्रीने स्वतःहून या बाबतीत पुढाकार घ्यावा व खऱ्या अर्थाने जीवनसाथी बनावे ही फार इच्छा. मात्र तिच्या धडपडीनेच हे शक्य होईल हा दृढ विश्वास.

त्यांची सुधारक वृत्ती व त्यांचे पुरोगामी विचार त्यांच्या कृतीतून डोकावत असत. जातिभेदांचा व धर्मांधतेचा त्यांना कमालीचा तिरस्कार. त्यामुळे कोणत्याही जातीच्या वा धर्माच्या व्यक्तीस स्वयंपाकघरापर्यंत प्रवेश खुला असे.

त्यांनी एकदा एका नवविवाहित हरिजन दांपत्यास जेवण्याचे आमंत्रण दिले. रात्री बरोबर आठ वाजता येण्याचे बजावले. जेवणाची सर्व तयारी आठ पूर्वीच झाली पाहिजे ही शिस्त. सर्व तयारी होऊन आठच्या सुमारास पाने मांडून आम्हीर पाहुण्यांची वाट पहात बसलो. आठाचे साडे आठ झाले; तरी पाहुण्यांचा पत्ता नाही. शेवटी पाहुण्यांखेरीजच जेवणे उरकली. दुसरे दिवशी पाहुणे कोर्टात भेटले. जेवणास न येण्याचे कारण विचारताच 'साहेब, माफ करा. मला तुमचे वेळाचे बंधन पाळता आले नाही; आणि उशीरा येण्याचे धाडस झाले नाही,' हे उत्तर. भागवत वेळेचे बंधन काटेकोरपणे पाळण्यात प्रसिद्ध होते. त्यामुळे तसा त्यांचा दराराही होता.

सरकारी वकिली म्हणजे लाच-लुचपतीने अमाप संपत्ति मिळविण्याचे एक उत्कृष्ट साधन समजले जाते. या बाबतीत कै. भागवतांची वागणूक आदर्श व निष्कलंक होती.

ऐन दिवाळीत एका पक्षकाराने उत्तमपैकी घरचे तूप, तांदूळ आणि खपली गहू व जमिनीत भाजलेली दोन रताळी दिवाळीची भेट म्हणून आणली. कडक धान्य नियंत्रणाचे दिवस असल्याने खेडेगावी या वस्तू अति दुर्मीळ. त्या वस्तू पहाताच भागवतांनी सर्व परत घेऊन जाण्यास सांगितले. ठेवून घेण्यासाठी त्याचा एकसारखा आग्रह चालू होता. सणावाराच्या दिवसात बायका-मुलांच्या तोंडचे काढून आणलेले जिन्नस परत घेऊन जाऊन दिवाळी मजेत घालविण्यास बजाबून त्याला परत पाठविले. तो अगदीच गयावया करू लागला तेव्हा दोन रताळी मात्र ठेवून घेतली. गरिबांच्या अगतिकपणाचा अगर अडचणीचा गैरफायदा त्यांनी कधीच घेतला नाही. या उलट प्रति-स्पर्ध्यांच्या वकिलांना यांना द्यायच्या नावाखाली पैसे घेतल्याची कितीतरी उदाहरणे उघडकीस आली होती.

अंगी घेतलेले कोणतेही काम अगदी जीव ओतून करण्याची त्यांची सवय.

लोक स्वातंत्र्य प्राप्तीच्या आनंदात असतानाच महात्मा गांधींचा खून झाला. त्याची प्रतिक्रिया महाराष्ट्रभर पसरली आणि सर्वत्र जाळपोळीचे सत्र सुरू झाले व लुटालूटही सुरू झाली. या दोन्ही प्रकारापासून गावकऱ्यांचे रक्षण करणे आपले कर्तव्य समजून त्या कामी भागवत पुढे सरसावले. या व अशासारख्या कामात त्यांच्या मॅजिस्ट्रेटसाहेबांचा सहकार्याचा हात सदैव पुढे असे. दोघांनी दिवसा कोर्टाचे काम उरकायचे आणि रात्री पोलिसपार्टी बरोबर घेऊन गावाच्या सीमेवर गस्त घालायची हा क्रम कितीतरी दिवस चालू होता. या दोघांनी अविश्रांत श्रम घेऊन गावाचे रक्षण तर केलेच पण गावात जळीताचा एकही प्रकार होऊ दिला नाही.

थोडयाच दिवसात जाळपोळ व लुटालूट थंडावली आणि चौकशीचे सत्र सुरू झाले. संबंधितांवर खटले भरले जाऊ लागले. हे खटले चालविणे म्हणजे सरकारी वकिलांना अक्षरशः एक सुवर्णसंधीच चालून आलेली होती

या जाळपोळीत व लुटालुटीत लोकांचा हात होता. या लोकांवर खटले भरले जाऊ नयेत अगर सरकारी वकिलांनी जास्त खोलात जाऊन चौकशी करू नये म्हणून भागवतांना नोटांच्या पुडक्यांची कितीतरी आमिषे दाखविली गेली. कोणत्याही प्रलोभनाच्या आहारी न जाणे हा बाणा आणि निस्पृहता यामुळे त्यांनी 'कोर्टासमोर येणाऱ्या पुराव्याच्या आधारे खटले चालवून सरकारला न्यायदानात मदत करण्यासाठीच माझी नेमणूक असून मला मिळणारा पगारही याचकरिता आहे' असे सांगून सर्वांना वाटेला लावले.

समाजातील गरीब व कमकुवत आणि अज्ञानी लोकांबद्दल त्यांना कमालीची सहानुभूती वाटत होती. धान्याच्या ने-आणीच्या कडक निर्बंधा-मुळे गरीब शेतकरी आणि मजूर अगदी त्रस्त झाले होते. श्रीमंत, व्यापारी आणि अधिकारी हे निर्बन्ध बेधडकपणे मोडून वाटेल तितकी धान्याची ने-आण करीत. आणि पैसा, अधिकार व वशिलेबाजी यावर सहीसलामत सुटत असत. सुटत नसे तो पोटासाठी आणि मुलाबाळांसाठी पसाकुडचा धान्याची ने-आण करणारा गरीब अज्ञान शेतकरी आणि मजूर.

अशा वेळी त्यांच्या मदतीसाठी आणि सुटकेसाठी कै. भागवत धाव घेत. त्यांचे मॅजिस्ट्रेटही या कार्यात सहभागी होत. हे दोघे अशा लोकांना कोर्ट सुरू झाल्यापासून बंद होईतो शिक्षा आणि पाच-सहा रुपये दंड करून सोडून देत. हा दण्डही भरण्यास असमर्थ असणाऱ्या गुन्हेगारास पुन्हा असे गुन्हे करून तुरूंगाच्या गजाआड राहून बायका-मुलांची दुर्दशा करण्यास धजावू नकोस असे सांगून दंडाची रक्कम ते स्वतः भरीत व त्याला मोकळा करीत. त्यामुळे त्यांचा संपूर्ण पगार कधीच घरी आला नाही.

सामान्य लोकांच्या हितासाठी काही करण्याची त्यांची धडपड चालू होती. त्या धडपडीतूनच त्यांनी सहकारी ग्राहक संस्था काढण्याची योजना आखली. या योजनेत भागधारक ग्राहकच घ्यायचे होते. जनतेला दैनंदिन गरजेच्या वस्तू चांगल्या, स्वस्त व ठराविक अल्प नफा घेऊन त्यांची व्यापाऱ्यांच्या भरमसाट नफ्यापासून मुक्तता करणे हा हेतु. या योजनेद्वारा होणारा नफा ठराविक प्रमाणात भागधारकाना देऊन उरलेल्यातून ग्रामीण व शिक्षण यावर खर्च करण्याची कल्पना होती.

कुटुंब मदत निधी ही आणखी एक योजना दृष्टिपथात होती. या निधीतून कुटुंबातील गरजू लोकांना मदत म्हणून खर्च केला जाणार होता.

या व अशाच प्रकारच्या योजनांची आखणी चालू असतानाच नियति एक निराळाच योजना आखीत होती. या सर्व योजना फक्त योजनाच राहाव्यात म्हणूनच की काय तिने क्रूरपणाने मृत्यूचे पाश भागवतांच्या मानेभोवती टाकले! आणि त्यांना त्यांच्या सर्व सुहृदांपासून दूर ओढून नेले! १८ मार्च १९५२!!

साऱ्या अशा आकांक्षा अनंतात विरून गेल्या!!

□ □

१

# " दशांगुले उरला "

जे जे आहे; ते ते विश्वांतरगत आहे; आणि जे जे नाही; असे आपण म्हणतो त्याचा त्याचा जन्म अस्तित्वाच्या पोटीच आहे हे समजले म्हणजे 'जे जे नाही,' ते ते देखील विश्वांतरगतच समजले पाहिजे. 'परमेश्वर अखिल विश्वात भरला आहे, हे मानावयास प्रथमक्षणी हरकत नाही; पण कर्ता म्हणून विश्वापलीकडील त्याचे अस्तित्व मानणे हे सुसंगत विचाराचे लक्षण दिसत नाही. वैचारिक गोंधळाचे ते एक उत्कृष्ट गमक समजावे. परमेश्वरमय बिश्ववादाची सत्यता या क्षणी आपण पाहात नाही.

२

विश्वामध्यें 'परमेश्वर' अमक्याच ठिकाणी आहे, असे म्हणतां येत नाही. जळी, स्थळी काष्ठी, पाषाणी, विश्वांतील प्रत्येक अणुरेणूंत तो भरला आहे. विश्व म्हणजेच परमेश्वर; आणि परमेश्वर म्हणजेच विश्व. परमेश्वराने विश्वाला निर्माण केले ? वा विश्वामध्ये परमेश्वराची कल्पना निर्माण झाली ? हे केव्हांही विसरूं नये की, आपल्या सर्व कल्पना, आपल्या सर्व क्रिया-प्रक्रिया, आपले सर्व विचार, आपलें सर्व तत्त्वज्ञान विश्वांतर्गत आहे. विश्वापलीकडे काही आहे किंवा काही नाही या श्रद्धेचा व अश्रद्धेचा जन्म विश्वव्याख्येच्या पोटी झाला आहे. परमेश्वरमय विश्ववादामध्ये

विश्वघटका गणिक परमेश्वर मानव देहधारी किंवा निराकार तत्त्व म्हणून समजला जातो.

३

मनुष्य हाही विश्वांतर्गतच आहे आणि तो सर्वस्वी विश्वमर्यादित आहे. त्याच्या कल्पना, त्याचे विचार, त्याच्या क्रिया विश्व नियमित आहेत. विश्वाबरोबर मानवाचा उदय झालेला नाही. समाजाच्या उदयात मानवाचा जन्म होत आला आहे. अज्ञानापासून सामाजिक मानवाची धाव ज्ञानाकडे चालू आहे. मानवी विश्वघटक विश्वाचे आकलन करीत आहे; किंवा आपण असे म्हणू या की, विश्व मानवमार्गे स्वतःचे स्वरूप स्वतः ओळखीत आहे.

४

विश्वांतर्गत मानव विश्वावर क्रिया-प्रक्रिया प्रथम करू लागला ? की विश्व व्यापारासंबंधी विचार प्रथम करू लागला ? अति महत्त्वाचा प्रश्न आहे. भूक नि तहान या मानवाच्या मौलिक गरजा आहेत. विचार ही त्याची मौलिक गरज नाही. विश्रांति नि मैथुन ह्याही त्याच्या दैहिक अनिवार्य क्रिया आहेत आणि स्वरक्षणासाठी त्याला विश्वपरिस्थितीचे भय बाळगावे लागत होते. पश्वावस्थेत वा वन्यावस्थेत मानवाला विचार करण्याची जरूरी नव्हती आणि विचार करण्याला त्या अवस्थेंत तो सर्वस्वी असमर्थ होता, हे अविवाद्य आहे. भाषेशिवाय नि भिन्नता-जन्य ज्ञानाशिवाय मनुष्य विचार तरी कसा करणार ? मानवाला प्रथम भाषाच नव्हती; ही गोष्ट अविवाद्य नाही काय ?

५

मानवाच्या विश्वावरील क्रिया-प्रतिक्रिया प्रथम कशा सुरू झाल्या !

त्याच्या पाशवी जीवनावस्थेंत मानवाला पृथ्वीशिवाय इतर विश्वाचा वा विश्वांतर्गत ग्रहा–उपग्रहांचा वा तारांगणाचा उपद्रव सहन करावा लागे. पृथ्वीवरही तो सर्वस्वी निसर्गाचा गुलामच होता. अशक्तांवर तो धाड घाली; सशक्तांच्या भक्ष्यस्थानी पडे; वा तो त्यांच्यापासून दूर रहाण्याचा प्रयत्न करी; पण त्याच्या या सर्व क्रिया–प्रतिक्रिया पूर्व विचारानुवर्ती होत्या असे म्हणण्यास वस्तुस्थितीचा यत्किंचितही आधार नाही. पावसांत तो भिजे अगर झाडाखाली आश्रय घेई; वडवाग्नींत जळून खाक होई अगर जन्मस्थान अग्नीच्या वणव्यात सापडलेले पहाताच दूर निघून जाई, मिळाल्यास कच्चे मांस खाई; अगर फळादी कंद मुळांवर निर्वाह करी. मानवी स्त्री नजरेत आल्यास त्याची मैथुनेच्छा इच्छा जागृत होई. विचाराधिष्ठित वा विचारानुवर्ती क्रिये–प्रतिक्रियेचा मानवाला या अवस्थेत गंधही नव्हता.

## ६

मानवी विचाराचा जन्मच मुळी मानवाच्या विश्वावरील या क्रिया-प्रतिक्रियेमध्येच आहे. मानव विचार करतो म्हणजे करतो तरी काय? मोठ मोठे महात्मे वा ऋषि-मुनि बंद कोठडीतून बाहेर आल्यावर 'जरा आसपास पाहू द्या, आणि मगच मी तोंड उघडेन;' असे म्हणताना आपण नेहमी ऐकतो, याला काही तात्विक अर्थ आहे काय? विश्वापासून अलिप्त राहून, विश्वांतील घटकांच्या एकमेकावर होणाऱ्या आणि सतत चालू असणाऱ्या क्रिया-प्रतिक्रियांकडे पाठ फिरवून मानवाला विश्वाचा व विश्वघटकातील क्रिया-प्रतिक्रियांचा विचार करणे सर्वस्वी अशक्य आहे, हा वरील उक्तीचा पहिला अर्थ आहे. दुसरा अर्थ असा कीवैचारिक क्रियेला दोन घटकांची प्राथमिक आवश्यकता आहे; एक विचारकरणारा, आणि दुसरा विचार विषय.

## ७

वन्यावस्थेतील वा पश्वावस्थेतील विचारक्षम असणाऱ्या मानवाच्या

वैचारिक पद्धतीचा विचार करण्यापूर्वी प्रथम त्याच्या संभाव्य विचार विषयांकडे वळू या. या अवस्थेतील विचारास असमर्थ असलेल्या मानवाचे विचार विषय तरी कोणते असू शकतील ? हे कोणीही मान्य करील की कायदा, धर्म, तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र व इतर सामाजिक शास्त्रे त्याचे विचार विषय असणे अशक्य होते. विश्वातील नैसर्गिक क्रिया प्रतिक्रियांचे पंचेंद्रियद्वारा अवलोकन नि अवगाहन करणे या पलिकडे त्या काळांतील मानवाची मजल जाणे अशक्य होते.

## ८

विश्वात निर्माण होणाऱ्या प्रत्येक सेंद्रिय नि सजीव विश्वघटकाला प्राथम्कि नि मौलिक स्वरूपाची दैहिक नि भौतिक जाणीव जन्मतःच होऊ लागते. त्या दैहिक नि भौतिक जाणिवेचे बाह्यस्वरूप 'मी व इतर सर्व विश्व' या प्रकारचे असते. मानवाच्या सर्व वैचारिक प्रगतीचे आदिमूळ या 'मी व इतर सर्व विश्व' या जाणिवेमध्ये आहे. विश्वांतर्गत वस्तूमधील भिन्नत्वाची जाणीव मानवाला प्रकृति-धर्मानुसार अधिक अधिक होत गेली. तत्त्वज्ञान्यांना असे म्हणता येईल काय ? कीं 'माती' पाहिल्याशिवाय वा हाताळल्याशिवाय तिचा 'मऊपणा' मानवाने प्रथम आपल्या ज्ञानदृष्टीने शोधून काढला किंवा तो तपश्चर्येत मग्न असताना, त्याला एकदम मऊपणाचा साक्षात्कार झाला; त्याने मऊपणाचे चिंतन केले, 'मऊपणाचे' गुणधर्म बुद्धीच्या जोरावर निश्चित केले आणि मग या मऊपणाची प्रचीती त्याला मातीत मिळाली; त्याचबरोबर त्याने 'मऊपणाचे' अनंत प्रकारही निश्चित करून टाकले !

## ९

स्वतः 'लाथ' खाल्ल्याशिवाय किंवा 'लाथ' कोणी कोणाला दिलेली पाहिल्याशिवाय माणसाला लाथेची कल्पना आली. वा लाथेचा साक्षात्कार

झाला, की लाथ खाल्ल्यानंतर वा कोणी कोणाला लाथ दिलेली पाहिल्यानंतर मनुष्याला 'लाथेची' कल्पना आली ? लाथेबद्दल तो विचार करू लागला. 'दैवी' बुद्धीच्या वा 'शुद्ध' बुद्धीच्या सहाय्याने मनूला जर चार वर्णांचा साक्षात्कार झाला, तर चारांच्या कालांतराने होणाऱ्या चार हजार जातींचा साक्षात्कार त्याला प्रथमच व्हावयास पाहिजे होता; किंवा चार वर्णांचे स्थल, कालातीत सनातन तत्त्व खरे होते, तर चार हजार जाती निर्माणच व्हावयास नको होत्या; तथाकथित तत्त्वज्ञान्यांचा परंपरागत पूर्वापार चालत आलेला असा दावा नाही काय की 'शुद्ध' बुद्धीच्या सहाय्याने मानवाला सनातन परमेश्वर-प्रणित अक्षय तत्त्वांचे नि सत्याचे पूर्ण ज्ञान होते ?

## १०

विश्वांतील वस्तू वस्तूंतील भिन्नत्वाचा अनुभव मनुष्याला ज्याप्रमाणे जन्मतः त्याच्या सजीव नि केंद्रिय प्रकृति-धर्मामुळे येतो; त्याप्रमाणे वस्तु-वस्तूंमधील समानधर्माचा, सादृश्याचा एक तत्त्वाचा अनुभव त्याला प्रकृति-धर्मांनुसार जन्मतः येत नाही. निरनिराळ्या वस्तूंतील सादृश्य वा एकत्व यांचे आकलन होण्यासाठी मानवाला आपल्या मेंदूचा प्रथम उपयोग करावा लागतो, तरी देखील त्याला विश्वामध्ये दोन सदृश वस्तू दिसाव्या लागतात. मनुष्याने 'आंबा' आणि 'पेरू' पाहिल्यानंतर आणि अनुभवल्या नंतर, त्याचप्रमाणे 'आंब्याचे' आणि 'पेरूचे' अनेक प्रकार पाहिल्यानंतर आणि अनुभवल्यानंतर त्याला समान- धर्माची वा एकत्वाची प्रतीति झाली असली पाहिजे. तात्पर्य हे, की मानवी दृष्टीने पाहिल्यास भिन्नत्वाच्या पोटी एकत्वाचा जन्म आहे. एकत्वापासून भिन्नत्व का, केव्हा नि कसे निर्माण झाले आणि त्याचा अंत कशात आहे ? इत्यादि प्रश्नांची उत्तरे मानवाला अनुभव, विचार नि ज्ञानोत्तर अनुभव यांच्या मदतीने मिळवावी लागतात. अस्तित्वाच्या प्रत्यक्षांतून नानां विश्व कल्पनांचा नि विचारांचा उदय होतो. त्यासाठी सर्व भौतिक शास्त्राचा अभ्यास व्हावयास पाहिजे.

## ११

मनुष्याच्या अनुभवाची, विचारांची, ज्ञानोत्तर अनुभवाची आणि त्याच्या विश्वावरील क्रिया-प्रतिक्रियांची व्याप्ती उत्तरोत्तर वाढत आलेली आहे आणि म्हणूनच हे योग्य दिसते की, मनुष्याला चिरकालिन स्थल-कालातीत अक्षय सत्य-एकच-एक सत्य-कधीही भेटणार नाही; अशा सत्याबद्दल त्याने केलीली मीमांसा, त्याने केलेले विचार; त्याने सांगितलेले तत्त्वज्ञान; त्याने ग्रंथित केलेले अनुभव मूलतः अपूर्ण नि सापेक्ष राहातात.

## १२.

अनुभवांची, विचारांची, ज्ञानाची, क्रिया-प्रतिक्रियांची वाढ व्यक्ति-निष्ठ नसून समष्टि-निष्ठ आहे. मानवी समाजाची देखील अशी एक अवस्था होती की, त्या सामाजिक अवस्थेत व्यक्ति स्वतःच्या गरजा स्वतः निर्माण केलेल्या वस्तूनीच भागवीत होती, तिचे स्वतःचे अनुभव, तिचे स्वतःचे विचार; तिच्या स्वतःच्या क्रिया प्रतिक्रिया एवढ्यावर तिचे स्वतःचे आयुष्य व्यतित होई. तरीसुद्धा हे लक्षात ठेविले पाहिजे की, स्वनिर्मित वस्तूनी स्वतःच्या गरजा भागविण्यासाठी लागणाऱ्या साधनांची आणि ज्यावर या साधनांचा उपयोग करावयाचा त्या निसर्गजन्य वस्तूंच्या आणि निसर्गाच्या ज्ञानाची भूमिका समष्टिनिष्ठच आहे. एकाका, एकांतिक असामाजिक व्यक्तीने या साधनांचा शोध लावलेला नाही किंवा साधनांचे नि निसर्गाचे ज्ञान त्याचे एकट्याचे नव्हे. पण त्याच व्यक्तीच्या मुलाला वा मुलीला स्वतःचे आयुष्य व्यतित करण्यासाठी पित्याच्या नि मातेच्या अनुभवांच्या, विचारांच्या नि क्रिया-प्रतिक्रियांच्या भूमिकेवरून पुढे जावे लागते. एका पिढीचे अनुभव, विचार, क्रिया-प्रतिक्रिया दुसऱ्या पिढीचा पाया नि सचय ठरतो. मागाहून येणाऱ्या व्यक्तीच्या वा पिढीच्या नवीन अनुभवांची, नवीन विचारांची आणि नवीन क्रिया-प्रतिक्रियांची पूर्वीच्या अनुभवामध्ये, विचारांमध्ये, आणि क्रिया-प्रतिक्रियांमध्ये भर पडत जाते. पण हे विसरतां कामा नये की ज्याप्रमाणे अपत्याचे मूळ

माता-पित्यांमध्ये आहे, माता-पित्याच्या अस्तित्वामुळेच अपत्याच्या अस्तित्वाची संभाव्यता होते; त्याचप्रमाणे पूर्व पिढीच्या विचार अनुभव नी -क्रिया-प्रतिक्रियांच्या अस्तित्वामुळेच नवीन पिढीच्या नवीन अनुभवांची विचारांची नि क्रिया-प्रतिक्रियांची संभाव्यता निर्माण होते.

## १३

जगांतील मोठमोठया शास्त्रज्ञांना जन्मतःच किंवा बाराव्या वर्षा-पासून एकाद्या गुहेत वा अरण्यांत ठेवले असते; आणि त्यांना समाजाच्या आणि समाज-निर्मित शास्त्राचा वाराही लागू दिला नसता, तर त्यांच्या हातून एकही शोध लागला नसता; कातकऱ्याप्रमाणे ते नागडे उघडेच हिंडत राहिले असते. फार काय, कातकऱ्यांच्या एवढीही त्यांची वैचारिक उन्नति झाली नसती. याही पुढें जाऊन आपणास असे म्हणता येईल की-पशूंप्रमाणेच त्यांच्या क्रिया नि त्यांचे विचार राहतील.

ॲटम ( अण्वस्त्राचा ) बाँबचा शोध कोणत्याही एकाच देशांतील एकाच पिढींतील, एकाच घराण्यांतील एकाच व्यक्तीच्या एकाकीच मिळ-विलेल्या ज्ञानामुळे लागलेला नाहीं. तो अखिल मानवजातीच्या अखिल वैज्ञानिक ज्ञानामुळेच शक्य झाला. समाजातील मनुष्याला समाजाबाहेरील स्वतंत्र व्यक्ति समजणे हा वैचारिक व्यभिचार आहे; ही भ्रांति आहे; खुळी समजूत आहे.

## १४

स्वप्ने प्रत्येकाला पडतात, आणि आजकालच ती पडतात असे नव्हे. वन्यावस्थेतील वा पश्वावस्थेतील मानवालाही स्वप्ने पडतच होती. आम्हाला आमच्या लहानपणी एक स्वप्न पडले होते ते स्वप्न विचार-प्रवर्तक असल्यामुळे येथें मुद्दाम देत आहोत; —

‘ज्या तलावांत मी माझ्या सहाव्या वर्षी पोहावयास शिकलो, त्या धावडशी येथील तलावांत आम्ही बुडू लागलो, आमचा लिंगदेहधारी आत्मा

२२३५४
निबंध
२५०१

( आम्ही स्वतःच ) आमचे शरीर बुडत असताना तलावाच्या कट्यावर बसून पहात होतो. शरीर बुडाल्यानंतर एक तासाने बरीच मंडळी जमली; आणि त्यांनी आमचा देह वर काढला, काही लोक ताटी बांधू लागले. ताटीवर आमचा देह ठेवून, तो दोरीने आवळताना आमच्या लिंग-देहधारी आत्म्याने लोकांना सांगितले की, 'तुम्ही हा देह जाळू नका. तो आमच्या घरातील एका खोलीत ठेवा; मी विश्वात दोन तीन दिवस फेरफटका करून येतो; आणि मग मला जर या देहात यावेसे वाटले तर मी पुन्हा या देहांत शिरेन. तीन दिवसानंतर तुम्ही हा देह खुशाल जाळा, पुढे तिसरे दिवशी आम्ही त्या देहात प्रवेश केला आणि लगेच आम्ही जागे झालो. लहानपणी मी रोज आईबरोबर देवळात 'पुराणास' जात असे. त्यावेळीं आत्मा, त्याचे अमरत्व व पुनर्जन्म यासंबंधीच्या कथा कानावर पडत असत.

## १५

वन्यावस्थेतील वा पशवावस्थेतील मानवाला कशा प्रकारची स्वप्ने पडत असतील ?

क्रूर प्राण्यांशी त्याने केलेल्या झटापटी, इतर मानवांशी झालेली द्वंद्वें, विश्वातील त्याने पाहिलेले देखावे, केलेल्या नि अनुभविलेल्या क्रियाप्रक्रिया, यांचीच स्वप्ने त्याला पडत असतील. स्वप्नांच्या या प्रकारामुळेच त्या मानवाची अशी समजूत झाली की, 'प्रत्येक प्राणिमात्राचे ठिकाणी, प्रत्येक वस्तूमध्ये, प्रत्येक मनुष्यामध्ये अशी एक प्रति आकृति ( लिंगदेह) असावी की जी जडदेहाचा त्याग करून इतःस्ततः संचार करू शकते वा क्रिया-प्रतिक्रिया करू शकते.' आत्म्याचे मूळ याच समजुतीत आहे. आत्म्याचा शोध तत्त्ववेत्यांचा नव्हे.

## १६

तत्त्ववेत्यांनी वन्यावस्थेतील आपल्या पूर्वजांच्या या समजुतीला वैचारिक पद्धतीचा विशिष्ठ तऱ्हेने उपयोग करून स्थिरता नि दृढता प्राप्त करून दिली. मनुष्याच्या अनुभवाबरोबर, विचारांबरोबर आणि ज्ञानोत्तर क्रिया

प्रतिक्रियांबरोबर मनुष्याच्या आपल्या वैचारिक पद्धतीबद्दलच्या ज्ञानातही उत्क्रांती होत आलेली आहे. विचारपद्धतीमध्ये ही अविरत सुधारणा होत गेलेली आहे.

## १७

एकोणिसाव्या शतकामध्ये मनुष्य स्वतःच्या देहाचे नि दैहिक क्रिया प्रतिक्रियांचे वास्तववादी ज्ञान करून घेऊ लागला. फिजिकल केमिस्ट्री, बायालॉजी, फिजिऑलॉजी वगैरे शास्त्रांतील मानवाच्या प्रगतीला एकोणिसाव्या शतकांत अधिकाधिक व्यापक स्वरूप येऊ लागले. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे नि विचार-प्रवर्तक तीन सिद्धांत दिसले. ट्रॅन्स्फर्मेशन ऑफ एनर्जी; आणि इव्होल्युशन किंवा डार्विनिझम्-एकोणिसाव्या शतकात पुढे येऊ लागले. त्यापूर्वी शतकानुशतके मनुष्याची अशीच समजूत होती की, विचार करणे ही मनुष्याची दैहिक क्रिया नव्हे.

## १८

विश्वांमध्ये प्रत्येक कार्याला कारणे असतात. त्याचप्रमाणे मनुष्याचा नित्याचा अनुभव असा की, प्रत्येक कार्याला कर्ता हवा. त्याने हा आपला नित्याचा अनुभव विश्वनिर्मितीला लावला; आणि विश्वाचा कर्ता कोणीतरी असला पाहिजे; विश्वाची गति, स्थिती आणि प्रलय त्याच्याच इच्छेनुसार होत आहे, विश्वातली एकही घडामोड वा उलथापालथ त्याच्या इच्छेशिवाय होत नाही, अशा प्रकारच्या समजुती धर्म-शास्त्रांनी प्रसृत करण्यास सुरुवात केली. जगातील समाजाचा अितिहास पाहिला तर असे दिसून येते की, जसजशा मानवाच्या विश्वावरील क्रिया प्रति-क्रिया वाढत गेल्या, तसतसे या क्रिया-प्रतिक्रियांतून उद्भवलेले त्याचे ज्ञान वाढत गेले, ज्ञानोत्तर त्याच्या क्रिया-प्रतिक्रिया अधिकाधिक बुद्धि-पुरस्सर होत गेल्या, आणि अशा क्रिया-प्रतिक्रियांमुळे अधिक ज्ञानाची संभाव्यता अधिकाधिक वाढत गेली. त्या प्रमाणात मानवाची परमेश्वराबद्दलची कल्पनाही

बदलत गेली आणि आता तो विश्व निर्मिणाऱ्या मानव-देहधारी परमेश्वराची कल्पना त्याज्य मानू लागला आहे.

## १९

सर्वस्व निसर्गावर अवलंबून रहाणाऱ्या मानवाने प्रत्येक निसर्ग-घटकाच्या ठिकाणी स्वतंत्र देवाची स्थापना केली. निसर्गाशी यशस्वी झगडा देता न आल्यामुळे निसर्गापुढे तो लीन दीन झाला. निसर्गातील उग्र घडामोडींचे त्याला सदैव भय वाटे, अर्थात निसर्गातील प्रत्येक घडामोडीपुढे तो अगतिक असल्यामुळे पूर्णपणे लोटांगण घेई. याच मनोभूमिकेतून विश्वमय परमेश्वर वादाचा उदय झाला.

## २०

पृथ्वीच्या पाठीवर अनेक मानवी समाज निर्माण झाले, अर्थात अनेक प्रादेशिक नि जातीय (Tribal) परमेश्वराचा उदय झाला. निरनिराळ्या मानवी समाजांतील झगडयांमध्ये प्रादेशिक नि जातीय परमेश्वर आपापल्या बाजूने भाग घेऊं लागले, एवढेच नव्हे तर एकाच मानवी उप-समाजामध्ये अधिकाधिक उपसमाज होत गेल्यामुळे नवीन नवीन परमेश्वर, उपपरमेश्वर उदय पावू लागले, त्यामुळे परमेश्वरांमधील लढायांची संख्याही वाढू लागली.

## २१

जोपर्यंत मनुष्य स्वतःच्या गरजा स्वनिर्मित वस्तूंनीच भागवीत होता तोपर्यंत वा त्या कालखंडात बहुविध परमेश्वरवाद प्रचलित होता. पण ही परिस्थिती अशीच राहिली नाही; दुसऱ्या कालखंडात मनुष्याला स्वतःच्या गरजा भागविण्यासाठी परनिर्मित वस्तूंकडे पाहावे लागे, या कालखंडात अधिकाधिक उपसमाज एकमेकांची वस्तु–मार्गे नि हळूहळू प्रत्यक्ष ओळख

करून घेऊ लागले. अनेक उप-समाजांनी एकत्र येऊन एकेक देश व्यापण्याचा उपक्रम सुरू झाला. त्याचा परिणाम असा झाला की, परमेश्वरांची संख्याही कमी झाली; अनेक परमेश्वरातून एका परमेश्वराचा जन्म झाला.

## २२

कित्येक शतके मानव देहधारी परमेश्वराची कल्पना रूढ होती; या परमेश्वराला सर्व मानवी विकार, विचार नि भावना चिकटविल्या गेल्या. हळू हळू ही मानवस्वरूपी परमेश्वराची कल्पना सर्व मानवी सद्‌गुणांकडे अधिकाधिक शुद्ध होत गेली. शेवटी परमेश्वराला सर्व गुणांचे अत्युच्च सार समजण्यात येऊं लागले. कालांतराने हे अधिकाधिक शुद्ध होत गेलेले मानवी स्वरूप हिसकावून घेतले गेले आणि त्याला ‘ चित्-शक्तीचे ’ स्वरूप दिले; स्खलनशील विश्वाला या ‘ चित्‌शक्तीचा ’ टेकू दिला. विश्व-व्यापार या चित् शक्तीमुळेच चालत आहेत आणि या चित्-शक्तीच्या स्वरूपाबद्दल ‘ नेति नेति ’ या मंत्राचा जप सुरू करण्यात आला. ‘ही चित्-शक्ति बुद्धीने आकलन होण्यासारखी नाही; बुद्धीची मजल सपल्यानंतर श्रद्धा, भक्ति आणि आत्मिक बल यांचा प्रदेश सुरू होतो. आणि या प्रदेशात ज्याची जशी प्रगति होईल तसा त्याला विश्वकर्त्याच्या स्वरूपाचा साक्षात्कार होतो आणि मानवी समाजात असे महाभाग युगायुगांतराने जन्माला येतात; व विश्व–विषयकर्दमांत लोळणाऱ्या मानवी समाजांना सन्मार्गावर ओढून आणतात; पण; त्यांच्या पश्चात हे मानवीसमाज पुनः कर्दमाकडेच धाव घेतात.’ अशी विचार मालिका जतन करण्यात आली.

## २३

तत्त्वज्ञानामध्ये दोन पंथ आहेत; एक अध्यात्मवाद आणि दुसरा भौतिक-वाद. काही तत्त्वज्ञानी आपल्याला अध्यात्मवादी समजतात आणि काही आपल्याला भौतिक-वादी मानतात. ज्यांच्या दृष्टीने, विचाराने वा भावनेने मानवाची नी मानवी समाजाची गणना या परस्परविरुद्ध मानले

गेलेल्या वादामध्ये करण्यात येते; ते सारे तत्त्वज्ञानी बेवकूफ होत. अध्यात्म-वाद हा भौतिक-वादाचा शत्रू नव्हे वा भौतिक-वाद अध्यात्म-वादाच्या मूळावर आलेला सैतान नव्हे. मानव विश्व–व्यापारांचे आकलन करू लागल्यावर त्यासाठी त्याने जें जे प्रयत्न केले त्या त्या प्रयत्नांची ही निर-निराळी स्वरूपे आहेत. सत्य ज्ञानाचा मार्ग प्रत्येक स्थळी, प्रत्येक काली एकच आहे; या एकच एक मार्गावर येण्यापूर्वी मनुष्याने चोखाळलेले अध्यात्मवाद आणि भौतिक वाद हे दोन मार्ग आहेत. प्रत्येक मार्ग सत्य ज्ञानाचे एकांगी रूप दाखवितो; सत्य ज्ञानाचे जास्तांत जास्त पूर्ण स्वरूप यथार्थत्वाने पहाण्यासाठी मनुष्याने या दोन मार्गांतील अनिवार्य एकांतिक-पणा नि भ्रामक समजुती नष्ट करून सत्य ज्ञानाकडे नेणारा सत्य-मार्ग एकोणीसाव्या शतकांत चोखाळण्यास सुरुवात केली.

## २४

सत्य ज्ञान म्हणजे काय हे यापुढे हळूहळू समजत जाईलच, पण त्याचे विवेचन करण्यापूर्वी अध्यात्मवाद वा अध्यात्ममार्ग आणि भौतिक मार्ग यांचे परीक्षण करू या. एक मौलिक गोष्ट लक्षांत ठेवणे की, विवक्षित काली, विवक्षित स्थली, नि एकाच एक विवक्षित युगांतराने अवतरलेल्या महाभागाने अध्यात्म–वाद मानवाला सांगितला आणि नंतर मानव त्या मार्गावर पावले टाकू लागला; ही गोष्ट सर्वस्वी असत्य आहे. अध्यात्म–वादाला मूळ आहे; आणि अंतकालही आहे; त्याचप्रमाणे अध्यात्म वाद अनेक महाभागांनी अधिकाधिक शुद्ध स्वरूपात नेला आहे; ही गोष्ट भौतिक वादालाही तितक्याच तऱ्हेनें लागू आहे.

## २५

अध्यात्म–वाद आणि भौतिकवाद यांच्या कालानुसार आणि नैसर्गिक ज्ञानाच्या शास्त्रादी प्रगति-नुसार झालेल्या वाढीकडे वळण्यापूर्वी आणखी एक अत्यंत महत्त्वाचा इशारा देण्यास हवा.

पहिला इशारा :- अध्यात्मवाद म्हणजे ध्येयवाद नव्हे.

दुसरा इशारा :- भौतिकवाद म्हणजे खाना, पीना, और गाना नव्हे.

'शुद्ध' बुद्धीलाच केवळ अवगत होणाऱ्या स्थलकालातीत सनातन तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्याचे ऐहिक साधुकार्य अंगावर घेतलेले बदफैली आपमतलबी प्रचारक अध्यात्मवादाला ध्येय-वाद समजून आणि भौतिक-वादाला 'सूकर' तत्त्वज्ञान लेखून आपल्या जिव्हा अज्ञ-समूहापुढे बेताल सल सोडीत असतात. पाद्री, मुल्ला आणि भटजी वा तत्सम लोकांचाच अशा प्रचारकांमध्ये मुख्य भरणा असतो; शालेय आचार्य आणि विद्यालयीन प्राध्यापक यातच मोडतात.

## २६

बदफैली नि आपमतलबी ही विशेषणे आम्ही एका विशिष्ट अर्थाने योजीत आहोत. विषय कर्दमाची व्यासपीठावरून निर्भत्सना करणारे महा-भाग ज्यावेळी आठ आठ बायका करतात त्यावेळी; संपत्तीचा धिक्कार करणारे महाभाग ज्यावेळी स्वतःची बँक मधील गंगाजळी वाढवीत जातात त्यावेळी; ज्यावेळी नानाविध सुखांचे अजीर्ण झालेले महाभाग कष्टाने मिळेल न मिळेल त्या मक्याच्या भाकरीवजा तुकड्यांना अमृत माना असा अट्टाहास धरतात त्यावेळी; ज्यावेळीं सर्व मानवजीवच काय पण सर्व प्राणिमात्र एकाच परमेश्वराची लेकरे आहेत असा 'पांच–जन्य' शंख फुंकणारे महाभाग गरिबी श्रीमंती ही पूर्वकर्मानुसार मानवाचा जन्मोजन्मी पाठपुरावा करणारी पापपुण्ये आहेत अशी गरिबांना आणि दीनाना शिकवण देतात त्यावेळी; आम्ही अशा विद्वान महाभागांना बदफैली नि आपमतलबी म्हणतो.

## २७

शास्त्रीय दृष्टया सर्व व्याख्या निरुपयोगी ठरतात; परंतु त्यांच्या मर्यादा नेहमी लक्षात राहिल्यास आणि उमजल्यास अशा व्याख्यांचा योग्य

ज्ञान मिळविण्याचे कामी थोडाबहुत उपयोग होतो. या दृष्टीने बघावयाचे झाल्यास, खालील व्याख्या थोड्या उपयोगी पडतील.

अध्यात्मवाद- १) ज्या विश्व-व्यापार कल्पनेत वा ज्या वैचारिक पद्धतीत विचार आणि कल्पना यांना पंचेंद्रिय-द्वारा मनुष्याच्या मेंदूरूपी आरशामध्ये विश्वव्यापारांची वास्तववादी उमटणारी प्रतिबिंबे मानण्यात येत नाही; विश्व मानवी पंचेंद्रियद्वारा मनुष्याच्या मेंदूमध्ये स्व-स्वरूपाविषयी वास्तववादी विचार आणि कल्पना उमटविते हे मान्य करण्यात येत नाही, त्या विश्वव्यापार कल्पनेला व वैचारिक पद्धतीला अध्यात्मवाद म्हणावे.

२) अध्यात्मवादामध्ये चित्-शक्तीला प्राथमिक मूल्य मानले आहे. या आध्यात्मिक मूल्याचा अविष्कार म्हणजेच हा अखिल विश्व पसारा.

भौतिक वाद-१) ज्या विश्व-व्यापार कल्पनेत वा ज्या वैचारिक पद्धतीत विचार आणि कल्पना यांना पचेंद्रिय-द्वारा मनुष्यांच्या मेंदूरूपी आरशामध्ये विश्व-व्यापारांची वास्तववादी उमटणारी प्रतिबिंबे मानण्यात येते; मानवी पंचेंद्रिये-द्वारा विश्व मनुष्याच्या मेंदूमध्ये स्व-स्वरूपाविषयी वास्तववादी विचार आणि कल्पना उमटविते, हे मान्य करण्यात येते; त्या विश्व-व्यापार-कल्पनेला वा वैचारिक पद्धतीला भौतिक-वाद म्हणावे. भौतिक-वाद म्हणजे जड-वाद नव्हे. जड-वाद हे अध्यात्मिक-वादाचे एक तार्किक विरोधी अंग आहे. अति महत्त्वाचा हा इशारा येथे प्रत्येकाने लक्षात ठेवावयास हवा.

भौतिक-वाद म्हणजे साम्यवाद वा ऐतिहासिक-भौतिकवाद नव्हे.

२) भौतिक-वादामध्यें विश्व हे एकच एक प्राथमिक स्वरूपाचे मूल्य मानले आहे. चित्-शक्तीला शरीराचे विकसित स्वरूप लेखण्यात येते.

## २८

साम्यवादाला सनातन सत्ये मान्य नाहीत. सत्याचा अर्थ साम्य-वादी दृष्टीने पारंपारीक अर्थापासून अगदीच वेगळा आहे. तो यथावकाश कळेलच.

साम्य–वादाला एकांतिक अध्यात्मिक–वाद मान्य नाही; त्याचप्रमाणे तो एकांतिक भौतिक–वादही मान्य करीत नाही. पण त्याच बरोबर हेही विसरू नये की, अध्यात्मिक–वाद आणि भौतिक–वाद ही निव्वळ सत्यें किंवा निव्वळ असत्ये आहेत.

साम्य–वादाची काही मौलिक ज्ञानेय गृहित–वजा प्रमेये आहेत.

१) विश्व हेच सत्य.

२) विश्व हे भौतिक सत्य आहे.

३) विश्व हे भौतिक आणि उत्क्रांतिशील सत्य आहे.

४) या भौतिक नि उत्क्रांतिशील सत्याचा पाया एकत्वरूप (Unity) उत्क्रांतिशील (developing) नि वस्तूनिष्ठ (Material) अस्तित्व (Realiy) हा आहे.

५) भौतिक वा वैश्चिक उत्क्रांतीचा 'मानवी-व्यक्ति' हा एक उत्क्रांतिशील भाग आहे. विश्वाच्या अनेक घटकांपैकी मानव हाही एक वस्तु-निष्ठ घटक आहे.

६) अ सामाजिक व्यक्तिनिष्ठ मानवाचा लिखित इतिहास उपलब्ध नाही. पण भाषा ही मूलतः सामाजिक असल्यामुळे असा इतिहास अपेक्षिणें हे निर्बुद्धपणाचे लक्षण आहे.

७) अवशेषांच्या सर्व प्रकारच्या अभ्यासावरून असे दिसते की, मनुष्य सामाजिक अवस्थेंत आल्यानंतर लाखो वर्षांचा काल उलटून गेला आणि त्याला सामाजिक अवस्थेत येण्यालाही लाखो वर्षे लागली, त्याचप्रमाणे त्याला प्रचलित मानवी देह प्राप्त होण्यालाही लाखो वर्षे लागली.

८) अलिखित अवशेषमय आणि लिखित इतिहासांवरून हे स्पष्ट नि अविवाद्य आहे कीं, उत्क्रांतिशील 'मानवी' मूल्यें उत्क्रांतिशील समाज-निष्ठ सामाजिक मूल्ये आहेत —

९) सर्व शास्त्रे विश्व-स्वरूपासंबंधी असल्यामुळे आणि विश्व एकत्व-रूप, उत्क्रांतिशील, वस्तुनिष्ठ अस्तित्व असल्यामुळे सर्व शास्त्रांमध्ये ज्ञानेय-संबद्धता व अविरोध असलाच पाहिजे.

१०) समाजांतर्गत मानवी शरीर हा ज्ञानाचा अविवाद्य पाया आहे.

ग्रंथालय पुणे
२५ दा. क्र. २२३४५
निबंध
२५०८
शाखा (स्थळ प्रत)

११) यथार्थता अथवा वैचारिक सार्थता हा ज्ञानांचा आणि शास्त्रांचा निकष आहे.

१२) स्वतःचे अस्तित्व टिकविण्यासाठी विश्व–बदल साधणे हे सामाजिक मनुष्याचे प्राथमिक कर्म आहे. या प्राथमिक कर्तव्यामधून अधिक ज्ञानाची पैदास होते; आणि या अधिक ज्ञानाचा उपयोग अधिक-विश्वबदल साधण्याकडे होतो. ही प्रथा अखंड चालू आहे आणि चालू रहाणार; कारण विश्वाला अंत नाही. प्रचलित मानवी जीवन एके ठिकाणी नष्ट झाले तरी विश्वात त्याचा प्रादुर्भाव दुसरे ठिकाणी होईल आणि नवीन मानवी जीवन अधिक उन्नत स्वरूपाचे होईल.

साम्यवादाची व्याख्याच करावयाची झाल्यास अशी करावी लागेल– समाज–नियमीत उत्क्रांति–शील मानवाचे क्रिया–प्रतिक्रियाजन्य नि मनुष्य विश्व व्यापारावर आधारलेले विश्वज्ञान आणि यथार्थ विश्व–ज्ञानानुसारी व समाजनिष्ठ व्यक्तींचे अधिकाधिक वर्धन साधणारी उत्क्रांतिशील समाज-रचना यांचा क्रियाशील संयोग साधणारी क्रिया–विचार–क्रिया–प्रणाली म्हणजेच साम्यवाद. या क्रिया–विचार–क्रिया प्रणालीत विश्वज्ञानाला, उत्क्रांतिशील समाज रचनेला आणि समाजांतर्गत व्यक्ति–वर्धनाला अमूक एक अशी मर्यादा राहात नाही.

## २९

समाजाने आणि समाजांतर्गत व्यक्तीने साम्यवादी परिस्थितीत पदार्पण केल्यानंतर समाजाची व समाजांतर्गत व्यक्तीची उत्क्रांति स्थगित होणार नाही. मानवी समाजाचे साम्यवादी परिस्थितींत पदार्पण होण्यास १९१७ साली सुरुवात झाली. हे पदार्पण अद्याप पूर्ण झालेले नाही. पण हे पदार्पण पूर्ण झाल्यानंतर काहीतरी स्थैर्य-काल जाईल आणि तदनंतर मानवी समाजांच्या पुढील व्यवस्थेबद्दल विचार सुचविणारी परिस्थिति साम्यवादी समाजात उद्भूत झालेली दिसेल.

साम्यवादाची रूपरेषा लक्षात येण्यास तीनशे वर्षांचा प्रगतिशील धनिकशाहीचा काल उलटावयास लागला. या रूपरेषेचे ज्ञान कोणत्याही

एका व्यक्तीचे नाही. साम्यवादाच्या भरभराटीतच पुढील सामाजिक प्रगतीची बीजे अंकुरित होतील.

पण एक गोष्ट मात्र निश्चित मानता येईल, की साम्यवादाच्या नंतरच्या सामाजिक परिवर्तनाना कोणाकडूनही खळखळ केली जाणार नाही. त्याची कारणे अशी:

१) उत्पादन साधने पूर्णतः सामाजिक मालकीची झालेली असणार.

२) वस्तूंचे उत्पादन समाजाच्या उपभोगासाठी शास्त्र शुद्ध-नियोजन पद्धतीने होत जाणार. मार्केटमधील हल्ली चालणाऱ्या देवाण-घेवाणी साठी चालू असलेले वस्तूंचे उत्पादन पूर्णपणे नष्ट झालेले असणार.

३) प्रचलीत आचार आणि विचार यांच्यामधील फारकत पूर्णतः नष्ट झालेली असणार.

४) सामाजिक ज्ञान आणि सामाजिक क्रिया यांच्यामधील विरोध नष्ट झालेला असणार.

## ३०

सत्य म्हणजे तरी काय ? शंकराचार्य, बुद्ध, ख्रिस्त, महंमद, गांधी आणि देशोदेशीचे अनंत छोटे मोठे तत्त्वज्ञानी, आचार्य, प्राचार्य, शिक्षक, प्राध्यापक आतापर्यंत सत्याचाच पुरस्कार करीत आले आहेत. या महात्म्यांनी सांगितलेल्या सत्याने जगांतील आम्हा सर्वांना वैचारिक गोंधळात आणि सतत वहात आलेल्या रक्त-पातात पूर्णपणे बुडवून टाकले आहे. हा आमचा गरिबांचा सर्वनाश साधणारे कृत्य कोणत्या प्रकारे सत्य आहे, हे एकाही महात्म्याने स्पष्ट केलेले नाही. विद्वानांच्या या राक्षसी कृत्य-मय सत्याचा-सत्यमय कृत्याचा नव्हे-आधार तरी कोणचा ?

अखिल विश्व हा एकच एक 'सत्याचा' आधार आहे. 'विश्वाबाहेर, विश्वाच्या आजूबाजूला, 'विश्वाच्या खाली अथवा वर' या किंवा तत्सम विचारांचाही किंवा श्रद्धेचाही आधार एकच एक आणि तो म्हणजे अखिल विश्व हाच आहे. 'विश्वाच्या बाहेर' ही विश्व पार्श्वभूमीवरील समाजांतर्गत

व समाज–नियमित मनुष्याच्या विचार–क्रियेने घेतलेली एक वैचारिक झेप किंवा स्वरूप आहे. हे क्रिया-मय सत्य आहे; ही वैचारिक भ्रांति आहे, ही वैचारिकता समाज नियमित मानवांच्या क्रिया–मय सत्याला विकृत स्वरूप वा गति देते, हे क्रिया–मय सत्य आहे.

या 'वैचारिक भ्रांतीला' जगांतील सर्व तत्वज्ञान्यांनी, अति–तत्व-ज्ञान्यांनी आणि महा–तत्त्वज्ञान्यांनी आपल्या सत्याचा आधार मानलेला आहे; आणि त्यांची सर्व वैचारिक क्रिया या वैचारिक भ्रांति–भूमिकेवरून चालत आलेली आहे. या वैचारिक भ्रांतीचे भूत १८४४ सालापर्यंत आम्हा गरिबांच्या मानेवर बसलेले होते. त्याच्या आसनाला या वर्षी पहिला प्रचंड धक्का मिळाला.

सत्याचा आधार विश्व आहे; किंवा विश्व म्हणजेच सत्य; ही गोष्ट मान्य झाल्यावर दुसऱ्या महत्वाच्या प्रश्नाचा विचार करावा लागतो. विश्वाधिष्टित सत्याची ओळख कशी करून घ्यावयाची? असामाजिक, अनिर्बंध व्यक्तीला सत्याची ओळख करून घेता आल्यास ती कोठपर्यंत करून घेता येईल? असामाजिक, अनिर्बंध व्यक्तीला वैश्विक सत्याची ओळख होण्याची शक्यता मान्य केल्यास, दुसऱ्या एका प्रश्नाचे उत्तर द्यावे लागेल. तो प्रश्न असा होता की, 'वैश्विक सत्याचे आकलन होण्यास मनुष्याला लाखो वर्षांचा काळ का जावा लागला? आणि त्याच्या वैश्विक सत्याचे पूर्ण उत्तर त्याला अजूनही का मिळू नये?' त्याचप्रमाणे जगांतील सर्व तत्त्वज्ञान्यांचे, अति तत्त्वज्ञान्यांचे आणि महा-तत्वज्ञान्यांचे या बाबतीत एकमत का होत नाही? या विद्वानांची निरनिराळी सत्ये का अस्तित्वात आली? आणि त्यांनी आम्हा गरीब मानवांची मुंडेछाट कां चालविली आहे? वैश्विक सत्याच्या पाच प्रेषितांनी आपल्या सत्यांनी मानवी रक्ताच्या नद्या, महानद्या वाहविणाऱ्या कृत्यांच्या भूमिकेचा संभव का निर्माण केला?

अितिहासांत घडलेल्या ज्या काही अविवाद्य घटना आहेत त्यापैकी दोन संशयातीत घटनांचा येथे उल्लेख करणे जरूर आहे. पहिली घटना अशी की सत्य, धर्म, राष्ट्र, नि संस्कृति यांच्या वेदीवर कोटच्यावधि लोकांच्या आहुति देण्यात आलेल्या आहेत. दुसरी घटना अशी की विश्वाबाहेरील सत्याची व भ्रांतीची विश्व ज्ञानानुसार अधिकाधिक शुद्धता होत गेलेली

आहे. वन्यावस्थेतील सामाजिक मानवांमध्ये अशी कल्पना वा समजूत प्रचलित होती की प्रत्येक मनुष्याच्या शरीरात एका लिंग देहाचे वास्तव्य असते; मनुष्य झोपल्यानंतर हा लिंग देह इतस्तत: भ्रमण करीत असतो. या कालात भाषाच नव्हती तर तथाकथित तत्वज्ञान कोठून पैदा होणार ? वैश्विक सत्याचे आकलन करण्याचा हा मनुष्याचा पहिला प्रयत्न होय. विश्वांतील सर्व घटकांमध्ये मानवी मनाप्रमाणेच आणखी एखादे मन असल्याची समजूत होणे हे मनुष्याच्या विश्व स्वरूपाचे आकलन करण्याच्या वैचारिक क्रियेचे दुसरे स्वरूप होय. यातून प्रत्येक वस्तूमध्ये, प्रत्येक घटकामध्ये मानव देहधारी परमेश्वराच्या अस्तित्वाच्या कल्पनेचा उदय झाला. याही कालात तथाकथित असामाजिक, अनिर्बंध तत्त्वज्ञानी अस्तित्वात नव्हते.

शेतीप्रधान उपसमाज जसजसे एकत्र येऊ लागले, तसतशी मानवदेहधारी उपपरमेश्वरातून एकच एक मानवदेहधारी परमेश्वराची कल्पना सुचू लागली. मनुष्याचे क्रिया-जन्य वैश्विक ज्ञान वाढू लागल्यावर आणि क्रिया-जन्य वैश्विक ज्ञानानुसार सामाजिक क्रिया घडू लागल्यावर त्याचप्रमाणे क्रियाजन्य वैश्विक ज्ञानानुसार होणाऱ्या सामाजिक क्रियेमध्ये विचाराची आणि क्रियेची फारकत झाल्यानंतर तथाकथित तत्वज्ञान्यांना मानव देहधारी एकच एक परमेश्वर वाद अपुरा आणि लंगडा वाटू लागला. त्यांनी मानव-देहधारी परमेश्वराचे उच्चाटण केले आणि या तत्वज्ञान्यांच्या उलथापालथीला विश्वाबाहेरील सत्याने, परमेश्वराने निमुटपणे मान्यता दिली ! आता परमेश्वर घडविणाऱ्या तत्ववेत्यांना निराकार 'चित्-शक्ती' 'आत्मतत्वाचा' साक्षात्कार होऊ लागला आणि विश्व हे या चित्शक्तीचे जड स्वरूप झाले ! यातून पुढे स्थलकालातीत अक्षर विचार-तत्त्व वाद पुढे आला.

या दोन अविवाद्य ऐतिहासिक घटनांवरून एकच एक निष्कर्ष निघू शकतो आणि तो हा की, 'वैश्विक सत्याचे' आकलन एकेका असामाजिक अनिर्बंध व्यक्तीला होणे सर्वथैव अशक्य आहे; या बाबतीत पशु आणि काल्पनिक एकाकी असामाजिक अनिर्बंध मनुष्य एकाच पातळीवर उभे रहातात. भूक लागली म्हणजे चारा खाणे; विश्वांतील निकटवर्ति भीति-

कारक घटकांपासून दूर रहाण्याचा प्रयत्न करणे; रोजच्या त्याच त्या अनुभवांवरून कार्य कारणाची प्राथमिक स्वरूपाची जाणीव दाखविणे; या पलिकडे एकाकी असामाजिक अनिर्बंध काल्पनिक व्यक्तीची प्रगति होणेच अशक्य आहे. मनुष्याच्या चौफेर प्रगतीला, स्वातंत्र्याला सामाजिक भूमिके-वरूनच सुरुवात होते. या सामाजिक भूमिकेवरून उभे राहून दूरवर, आजूबाजूला आणि वर–खाली दृष्टीची फेक साधण्यास मनुष्याला लक्षावधि वर्षे विश्वाशी आणि विश्वघटकांशी विश्व-विरोधी सहकार करण्यात घालवावी लागली.

विश्व-सत्याची ओळख माणसाला कशी होणार ? डोळे, कान, नाक, जीभ. हात आणि मेंदू या सहा उपकरणांव्यतिरिक्त मनुष्याजवळ विश्वाची ओळख करून घेता येईल असे दुसरे कोणतेही साधन नाही. विश्व-व्यापारांचे संशोधन करण्यासाठी मनुष्याने आपल्या शारीरिक अवयवांची ताकद यंत्रद्वारा पराकोटीला नेण्याचा सतत प्रयत्न चालू ठेविला आहे. आणि तो असाच चालू राहील. डोळ्याशिवाय दुर्बिणीला स्थान नाही. किंवा हाताशिवाय यंत्रांना अर्थ रहात नाही. ही सहाच ज्ञान साधनें प्राथमिक, मौलिक, नि अविवाद्य रहातात.

विचार, मन, आत्मा, आंतरज्ञान वगैरे शब्दांनी दर्शविली जाणारी कल्पना आणि तिची पार्श्वभूमि यांचा विचार करू या. मानवी शरीरामध्ये मेंदु हा अति महत्त्वाचा भाग आहे मनुष्य आणि विश्व यांच्यांमध्ये घड-णाऱ्या सर्व प्रकारच्या क्रिया पंचेंद्रियद्वारा मनुष्याच्या मेंदूत प्रवेश करतात; शरीरावर व मेंदूवर घडणाऱ्या वैश्विक क्रिया परिणामाना मनुष्याच्या मेंदूमध्ये शरीरानुवर्ति गति नि स्थिती प्राप्त होते. बदललेल्या पण विशिष्ट गति न स्थिति प्राप्त झालेल्या मनुष्याचे शरीर व मेंदू नव्या वैश्विक परि-स्थितीत विश्वाच्या वा विश्व घटकांच्या सान्निध्यांत येतात. येथून पुढे नवीन अनुभवांची आणि अनुभवजन्य नवीन विचारांची परंपरा अबाधितपणे नि अव्याहत सुरू राहाते.

मनुष्याच्या विचारांचा आत्म्याचा मनाचा आंतरज्ञानाचा उगम विश्वाशी आणि विश्वघटकांशी त्याच्या अव्याहतपणे सुरू असलेल्या

क्रिया-विचार-प्रतिक्रियात्मक सान्निध्यात आहे. गुहेत बसून किंवा हिमालयातील मानस-सरोवराचे पाणी पिऊन मनुष्याला विश्वाचे आकलन कधीही होणार नाही. विचारांचा, अंतर्ज्ञानाचा, आत्म्याचा, मनाचा कोणत्याही दैविक शक्तीशी कोठल्याही प्रकारे संबंध नाही.

तत्वज्ञानी असे म्हणतात की शुद्ध बुद्धीशिवाय मनुष्याला सनातन वैश्विक सत्यांचे वा तत्त्वांचे आणि त्यांच्या पाठीमागील प्रेरक शक्ती असलेल्या परमेश्वर-तत्त्वाचे आकलन होणार नाही. सामान्य बुद्धीचा प्रांत संपल्यानंतरच शुद्ध-बुद्धीचा प्रांत सुरू होतो. या शुद्ध-बुद्धीच्या प्रांतात ज्याची जशी प्रगति होईल तशी त्याला शुद्ध-ज्ञानाची आणि परमेश्वर-तत्त्वाची प्राप्ती होत जाईल. सनातन सत्ये आणि परमेश्वर तत्त्व आपण तूर्त बाजूला ठेवू या. प्रथम शुद्ध-बुद्धीचाच विचार करू या.

शुद्ध-बुद्धि म्हणजे काय ? स्थल-कालातीत तत्त्वांचे दर्शन ज्या बुद्धीला घडते ती शुद्ध बुद्धी असे त्यांचे म्हणणे आहे. सामान्य बुद्धि स्थलाने आणि कालाने मर्यादित आहे. आकार, रंग रूप आणि पंचेंद्रिये या सर्वांनी अनुल्लंघनीय मर्यादा सामान्य बुद्धीच्या भोवती उभ्या केलेल्या आहेत. स्थल कालातीत अक्षर तत्त्वांचे आकलन फक्त ऋषि-मुनींच्या शुद्ध-बुद्धीलाच शक्य होते !

या सर्व बदफैली तत्त्वज्ञान्यांना-आणि या सर्वांचे आपापसात कधीही ऐक्य होत नाही-जर प्रश्न विचारला की शुद्ध-बुद्धीच्या राज्यात सामान्य माणसाला नेऊन सोडील असा एकादा पूल तुम्ही बांधून दाखवाल काय ? तर त्यांचे एकच एक उत्तर असे येते की, 'सामान्यांनी महाभागावर अविचल श्रद्धा ठेवावी. सामान्य माणसांनी आम्हा नेत्यांना-तत्त्वज्ञानी, अर्थशास्त्रज्ञ, समाज-शास्त्रज्ञ, धर्मज्ञ, कर्मज्ञ वगैरे वगैरे नादानाची जात-प्रश्न विचारू नयेत. त्यांनी फक्त आमच्या आज्ञा पाळाव्यात. म्हणजेच समाजाचे, धर्माचे, राष्ट्राचे आणि जगाचे कल्याण होईल.' अन्नपाण्याशिवाय साठ साठ हजार वर्षे तपश्चर्या करणाऱ्या इंद्रिय निग्रही ऋषिमुनींचाच शुद्ध-बुद्धि या दैवी इंद्रियाची प्राप्ति होते. या पायरीपर्यंत सामान्य जनसमूह जाऊच शकत नाही ! तात्पर्य, अशा अतींद्रियाने अक्षर तत्त्वाचा होणारा साक्षात्कार समजावून कसा सांगता येईल, किंवा त्या साक्षात्कारापर्यंत नेऊन पोच-

विणारा धोपट भौतिक मार्ग तरी कसा बांधता येणार ?'

आम्ही साठ हजार वर्षे जगत नाही. त्याचप्रमाणे मानवी इंद्रियांचे दमन अथवा हनन करण्याचीही आमची इच्छा नाही. इतरांच्या इंद्रिय-सुखाच्या आड न येता आम्हाला आमचे अनेकविध इंद्रिय सुख साधावयाचे आहे; एवढेच नव्हे तर सर्वांच्या इंद्रिय सुखाचे वर्धन साधणारी समाज-व्यवस्था कशी निर्माण करता येईल या ध्येयाकडेच आमचा बुद्धिवाद आणि यत्नवाद खर्च झाला पाहिजे असा आमचा आग्रह आहे.

आणि म्हणूनच आम्ही अतींद्रियवादी ऋषि मुनींच्या भूमिकेचा स्वप्नात देखील विचार करू इच्छित नाही. 'धर्म आणि संस्कृति हा समाज व्यवस्थेचा नि समाज स्वास्थ्याचा मूलभूत पाया आहे, आणि या पायाला साम्यवादाचा सुरूंग लागू देता कामा नये एवढयासाठी आम्ही गरिबांची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, आणि राजकीय उपासमारी व मुंडेछाट कितीही प्रमाणात व कोणत्याही सूक्ता-सूक्त मार्गांनी करण्यात आली तरी ती समाजाच्या नीतीसाठी, सुव्यवस्थेसाठी आणि शांततेसाठी आवश्यक व अध्यात्मिक दृष्टीने सर्वथैव समर्थनीय आणि म्हणून उपेक्षणीय अशीच आहे.' शासनसंस्था प्रणित सामाजिक नीति, सामाजिक सुव्यवस्था आणि सामाजिक शांतता ही स्वतंत्र, सर्वमान्य, सर्वस्पर्शी, सर्वोदयकारी तत्त्वे नव्हेत, हे भडभुंजांच्या नि बडव्यांच्या लक्षात कधीही येणार नाहीं, असे नव्हे; वर्ग-स्वार्थापायी ते असा दावा बुध्याच मांडीत आहेत. ज्यावेळेस प्रचलित समाज-व्यवस्थेचे अर्थशास्त्री, नीति वादी, धर्मवादी, संस्कृतिवादी व कायदे- पंडित भडभुंजे आणि बडवे आम्हा गरीबांशी असा दावा घालू लागतात त्यावेळी, 'अतींद्रियवाद, सनातन तत्त्ववाद, परमेश्वर-तत्त्व-वाद, धर्म-वाद, संस्कृति-वाद हे सारे वाद वर्ग-निष्ठ नि बदफैली विद्वानांची थोतांडे आहेत,' अशी भूमिका घेणे आम्हास प्राप्त कर्तव्य वाटते. आमच्या मते बुद्धीला अनाकल-नीय असे विश्वात काहीही नाही. व्यक्तीची बुद्धि असमर्थ ठरेल; पण मानवी समाजाची बुद्धि आता विश्वाएवढीच अमर्याद नि अफाट आहे. या मानवी बुद्धीची उत्क्रांति विश्वक्रांतीबरोबरच होत जाणार आहे. भडभुंजांना व बडव्यांना आमचे असे सांगणे आहे की, या पुढील साठ हजार वर्षांनंतर

पाठीवर असा एक तरी महात्मा आहे काय ? आणि असे महात्मे दोन किंवा अधिक असल्यास त्यांच्यामध्ये एकवाक्यता असलीच पाहिजे. अशा महात्म्याच्या क्रियांचा, विचारांचा, आणि विशेषत्वांचा परिणाम म्हणून सर्व मानवी समाजामध्ये सुसूत्रता आणि एक-वाक्यताच निर्माण व्हावयास हवी. एका महात्म्याचे कार्य दुसऱ्या महात्म्याने मानवी समाजामध्ये पुढे न्यावयाला पाहिजे. या सांगितलेल्या कसोटीस एकही महात्मा, एकही तत्त्वज्ञानी उतरत नाही. शंकराचार्य, बुद्ध, येशू, महंमद वगैरे प्रेषितांपैकी कोणीही विश्वाबाहेर झेप घेऊन परमेश्वर-तत्त्वाची माहिती बरोबर आणलेली नाही. टिळक आणि आगरकर थोर पुरूष होते ना ? मग एकमेकांत कां झगडत राहिले ? केळकर आणि परांजपे माकडे नव्हती ना ? तरी सुद्धा साध्या प्रश्नांवर त्यांच्यामध्ये लाथाळी कां चालावी ? नेहरू, टंडन थोर विभूतीच समजावयाच्या ना ? कुत्र्या, मांजराप्रमाणे का झगडताहेत हे लोक ? यांना अक्कल नाही, तर अक्कल आहे कोणाला ? जगांतील सारे तत्त्वज्ञानी आपापसात गाढवाप्रमाणे एकमेकावर दुगाण्या का झाडीत आहेत ? आणि सबंध जगाने, सर्व धर्मानी, सर्व संस्कृतीनी आणि त्यांच्या सुसज्ज सैन्यानी धिक्कारलेला, अवमानलेला, वाळीत टाकलेला, शस्त्रास्त्रांच्या आघातांनी खंडिलेला साम्यवादाचा ध्वज डौलाने फडकत का उभा रहावा ? वैश्विक सत्य कोणाच्या बाजूने पावले टाकीत आहे ? हें या एकाच गोष्टीने सिद्ध होईल.

सत्य असे आहे की, 'परमेश्वर तत्त्वाचे प्रेषित, परमेश्वर तत्त्व, स्वर्गातून उतरलेले महात्मे, ऋषि-मुनि, तत्वज्ञानी' वगैरे वगैरे सनातन तत्त्वें सारी आता थोतांडे म्हणून राहिली आहेत. महात्मा गांधी १९१४ मध्येच महात्मा म्हणून उद्‌भूत का झाले नाहीत ? आणि गांधी महात्मा होते तर १९४७ मध्ये हिंदुस्थान स्वतंत्र होण्याऐवजी १९१४ मध्येच का स्वतंत्र झाला नाही ? विद्वान लोकांचा, विद्वान-तत्वज्ञान्यांचा पाठिंबा त्यांना १९४७ मध्ये जेवढा मिळाला तेवढा १९१४ मध्येच का मिळाला नाही ? कां १९१४ मध्ये परमेश्वर मेला होता तो १९४७ मध्ये जिवंत झाला ? भडभुंजे आणि बडवे नेहमी जास्त पगार देणाऱ्यांचीच टाळी वाजवीत रहाणार. समाजाला, समूहाला महत्त्व आहे. व्यक्तीला नाही. ज्ञान समाजाचे आहे, व्यक्तीचे

नाही. समूह-क्रिया प्रभावी आहे, व्यक्ति–क्रिया नाही-हे सत्य भडभुंजांना व बडव्यांना कधीच उमगणार नाही.

तात्पर्य, विश्व हे एक भौतिक नि बदलत जाणारे सत्य आहे, विश्वापलीकडे काही नाही. वैश्विक सत्याची ओळख पंचेंद्रियद्वारा व मेंदूच्या सहाय्यानें मनुष्याला करून घेता येते. वैश्विक सत्य हुडकण्याचा हा एकच एक मार्ग मनुष्याला उपलब्ध आहे.

मागे आलेच आहे की वैश्विक सत्य ज्ञानाचा उगम मनुष्य आणि विश्व उणे मनुष्य यांच्या संबंधामध्ये आहे. या संबंधाचे स्वरूप कसे आहे ? हा संबंध दोन घटकांमध्ये आहे. हे दोन्ही घटक एकसारखे बदलत आहेत, त्याचप्रमाणे ते एकमेकांचे क्रिया-विषयही आहेत. वैश्विक सत्याचे ज्ञान होण्यास या दोन्ही घटकांचे ज्ञान व्हावयास पाहिजे; एका घटकाचे दुसऱ्या घटकावर होणाऱ्या प्रतिक्रियांचे ज्ञान व्हावयास पाहिजे. मनुष्य विश्वाचे मानवी–करण घडवीत आहे; आणि विश्व मानवाचे वैश्वीकरण करीत आहे.

थेथे मानवी समाजाची उत्क्रांती पहावयास हवी. म्हणजे सत्य ज्ञानाची उत्क्रांति कळणे सोपे होईल. विश्वांतर्गत; विश्व-नियमित, विश्व घटकोत्पन्न जीवाला मानवी स्वरूप येण्याला हजारो, कोटयावधि वर्षांचा कालावधि लोटावा लागला.

प्राथमिक जीवाची माकडामध्ये उत्क्रांति होण्याला शेकडो, कोटयावधि वर्षे जावी लागली; त्याचप्रमाणे माकडामधून मनुष्याची उत्क्रांती होण्यालाही कोटयावधि वर्षांचा काल गेला असला पाहिजे. हिंदी महासागराच्या तळाशी गेलेल्या खंडप्राय भूभागावरील ऊष्ण प्रदेशांतील जंगलामध्ये उत्क्रांत मर्कट समूह वावरत होते.

वनांमधून झाडावर रहाणाऱ्या माकडांना आपल्या पुढील पाय–वजा शारिरिक भागांचा मागील पाय-वजा शारीरिक भागांपेक्षा अधिकाधिक नि निरनिराळया तऱ्हेने उपयोग करणे भाग पडू लागले. फळे तोडणे, शत्रूवर फळांचा, काटक्यांचा, दगडांचा वर्षाव करणे; झेप घेतल्यानंतर आधार पकडणे; या व अशा प्रकारच्या जीवनावश्यक क्रिया करणे भाग पडल्यामुळे पुढील पायांची वाढ मागील पायांच्या वाढीपेक्षा निराळया दिशेने होऊ लागली. पुढील पायांना हातांचे स्वरूप येऊ लागले.

पुढील पायांचे हातांत रूपांतर होण्यालाही लक्षावधी वर्षे जावी लागली; माकडांच्या पुढील पायांची हाताच्या दिशेने वाढ होत असताना मागील पायांचा उपयोग अधिकाधिक ताठ उभे राहाण्याच्या दिशेने होऊ लागला व मागील पायांची वाढ त्या दिशेने होऊ लागली.

हाता-पायांची वाढ होण्याबरोबरच या वाढीचा परिणाम म्हणून माकडांच्या मेंदूची व मेंदूबरोबर इतर पंचेंद्रियांचीही वाढ होऊ लागली. शरीरांतील एका भागामध्ये झालेला फरक शरीराच्या दुसऱ्या असंबंधित भागामध्येही फरक घडवून आणतो असा अनुभव उत्क्रांति- शास्त्रामध्ये ग्रथित आहे. माकडांच्या या शारीरिक उत्क्रांतीमध्ये त्यांच्या इतर क्रियांचा भाग आहे. फळे, फुले, आणि पाने हा त्यांचा मूळचा आहार; हा आहार अमर्याद नि अबाधितपणे मिळणारा नव्हता. आहार भूमीचे क्षेत्र वाढविणे जसजसे अशक्य होऊ लागले तसतशी आहाराची नवीन क्षेत्रे शोधणे भाग झाले. शिकार व मच्छिमारी या दोन नवीन आहार-प्रकारामुळे माकडांच्या शारिरीक उत्क्रांतीला झपाटयाची गति मिळाली; शिकारीची व मत्स्य-मारीची शस्त्रे तयार करणारा हात अधिकाधिक उन्नत होत आला. माकडांना मानवाचे स्वरूप आले. कालांतराने शेती व पशु-संवर्धन या दोन अन्न साधनांकडे मनुष्याला वळावे लागले; आणि या दोन्ही अन्न-साधनांच्या क्रियांचा परिणाम म्हणून मनुष्याचा मेन्दू आणि त्याची पंचेन्द्रिये अधिका-धिक समर्थ आणि सस्कारक्षम होत गेली.

या उत्क्रांति कालखंडात मनुष्यांच्या सामुदायिक क्रिया आणि त्यांचे विविध प्रकार वाढीस लागल्यावर सर्वांना शारीरिक क्रिया दर्शकांची आणि मानसिक क्रिया-दर्शकांची अनिवार्य गरज भासू लागली. गळ्यांतून व मुखांतून समान क्रिया वा समान स्थिति वा समान भावना निदर्शक भिन्न आवाजांची जरूरी निर्माण झाली; आणि यातूनच मनुष्याची भाषा निर्माण झाली. मानवी क्रियांची व्याप्ति वाढूं लागल्यावर मनुष्याची शब्दोच्चारक्षमताही वाढीस लागली, त्याचबरोबर भाषेचाही प्रांत समृद्ध पावूं लागला. वन्य जनावरांना मनुष्याच्या साहचर्यामुळे ठराविक प्रमाणांत मानवी शब्दांचे ज्ञान होऊ लागते हा नित्याचा अनुभव आहे, एवढेच नव्हे, तर त्यांच्यामध्ये मनुष्याबद्दलचे प्रेम, कृतज्ञता वगैरे भावनाही उद्भूत होतात.

पोपट मनुष्याची भाषा बोलू शकतो, आणि समजूही शकतो. सामुदायिक साहचर्य, सामुदायिक क्रिया-प्रतिक्रिया, निसर्गाशी सुरू असलेला सामुदायिक झगडा यांच्यामुळेच मनुष्याच्या गळ्याची उत्क्रांति झाली, आणि भाषेचा जन्म झाला. भाषेमुळे मनुष्याच्या विश्वाबरोबर होणाऱ्या क्रिया-प्रतिक्रिया अधिकाधिक विकसित होत गेल्या, आणि विकल्पित होत जाणाऱ्या क्रिया-प्रतिक्रियांमुळे भाषाही विकसित होत गेली भाषेला समर्थ आणि स्वतंत्र साधनाचे स्वरूप आले; पण या सामर्थ्याचे आणि स्वातंत्र्याचे मूळ दृष्टिआड करून चालणार नाही. भाषेला स्वयंभूपणा नाही; तिचा स्वतःचा असा वेगळा संसार नाही; ती कायमची मनुष्य आणि विश्व यांच्यामधील परस्परांवर होणाऱ्या क्रिया-प्रतिक्रियांशी संलग्न आहे. संस्कृत भाषा कां मेली हें यावरून कळणे सोपे होईल.

मानवी समूह जीवन-रक्षणासाठी कृषिवर्धनाकडे आणि पशुवर्धनाकडे वळल्यानंतर त्यांच्या जीवनक्रियेला स्थायिकत्व प्राप्त झाले; त्याचबरोबर त्यांचे संचार-स्वातंत्र्य नष्ट झाले; पण नवीन प्राप्त झालेल्या स्थायिकतेमुळे मनुष्य-समूहांच्या उत्क्रांतीला अधिक वाव व गति प्राप्त झाली; त्याचप्रमाणे त्याच्या निसर्गाबरोबर झालेल्या स्थिर दोस्तीमुळे त्यांना निसर्गाचे अधिकाधिक ज्ञान प्राप्त होण्याची शक्यता निर्माण झाली. देश आणि राष्ट्र यांची संभाव्यता उदयास आली.

सामुदायिक शेती, समूह-रक्षण आणि सामुदायिक शेतीचे रक्षण या व इतर अनेकविध क्रिया सर्वच्या सर्व समूहाला करणें गैरसोयीचे होऊ लागले, त्यामुळे मानवी समूहामध्ये समूह–निष्ठ श्रम–विभाजन करणे अत्यावश्यक झाले. समूह–निष्ठ श्रम–विभाजनाचा अर्थ असा की समूहातील एक किंवा अनेक व्यक्ती जे अन्नोत्पादन कार्य किंवा अन्नोत्पादन–पोषक कार्य करीत होत्या ते अन्नोत्पादन कार्य किंवा अन्नोत्पादन पोषक कार्य समूहाच्यासाठी होत होते; आणि अशा उत्पादनांतील भाग व्यक्तीला मागाहून तोडून दिला जाई. गरजेनुसार उद्भवलेल्या श्रम–विभाजनाचे फायदे असे दिसू लागले की श्रमविभाजनावर आधारलेले कार्य अधिक फलदायी होते; हे अधिक फायदे दिसून आल्यावर समूहामध्ये श्रम-विभाजनाची अधिकाधिक वाढ होत गेली. हा श्रम-विभाजनाचा साक्षात्कार गुहेत चिंतन करणाऱ्या

मानवी बुद्धीची झेप पहाण्यास तुम्ही तुमच्या परमेश्वर-तत्त्वापासून एकादा वर मागून घ्या. साठ हजार वर्षे जगण्याचा वर देवाने या भडभुंजांना आणि बडव्यांना देण्याचे देखील कारण नाही. आणखी वीस पंचवीस वर्षे जरी जगलात तरी बस्स आहे. पण जगा म्हणजे झाले. हिटलरसारखी आत्महत्त्या करू नका, किंवा भेकड मुसोलिनीप्रमाणे मरणाला कवटाळू नका. विश्वाच्या भौतिक उत्क्रांतीचे नियम मानवी बुद्धीला जसजसे उमगत जातील, तसतशी मानवी बुद्धि विश्वाशी सहकार्य करून विश्वापासून स्वतंत्र होत जाईल. चंद्राप्रमाणे पृथ्वी थंडगार पडली तर त्या वेळचा मानवी समाज दुसऱ्या एका ग्रहावर वस्तीसाठी जाईल. तुमच्या साठ हजार वर्षे तपश्चर्या करणाऱ्या ऋषि-मुनींची पुढील उत्क्रांतीशील समाज-निष्ठ-मानवाचे जोडे उचलण्याची देखील लायकी नाही.

आता स्थल-कालातीत शुद्ध बुद्धीतील स्थलाचा आणि कालाचा विचार करू या. भडभुंजांच्या आणि बडव्यांच्या तत्त्वज्ञानी दृष्टीने पहाता ' काल ' ही एक स्वतंत्र अफाट नि अमर्याद चीज आहे. या कालामध्ये वैश्विक घटना परमेश्वर तत्त्व स्वेच्छेनुसार हळूहळू मानवांना उकलून दाखवीत आहे. परमेश्वर तत्त्वाच्या लहरीनुसार विश्व घटना कालामध्ये मागे जातात, थबकतात; पुढे जातात, पुन्हा मागे जातात; किंवा लुप्त होतात. विश्वाला कालाच्या आणि स्थलाच्या मर्यादेत राहून परमेश्वर तत्त्वांच्या लहरीं-प्रमाणे तेच ते चक्र फिरावे लागते.

उत्क्रांति नसेल तर जीवन अशक्य होते. जीवनांतून मानवी अस्तित्व उत्क्रांत होत आलेले आहे; पण विश्वोत्क्रांतीचे तत्व एकदा अमान्य केल्यावर मानवी अस्तित्वही नाकारावे लागते. मानवी अस्तित्व नाकारल्या-नंतर मानवी क्रियेचा, मानवी बुद्धीचा आणि मानवी समाजाच्या अस्तित्वाचा विचार तरी कोण करू शकेल ? दगड दगडच राहिल्यानंतर त्याला सूर्याचे आणि उष्णतेचे किंवा थंडीचे ज्ञान होईल हे थोतांड नव्हे काय !

विश्वामध्ये जीवन उत्क्रांत झाल्यानंतरच म्हणजे जीवनाच्या उत्क्रांती-बरोबरच सूर्य आणि चंद्र किंवा उष्णता आणि शीतलता या अनुभवांची उत्क्रांति झाली. मृत्यूतून जीवनाचा उदय झाला; आणि त्याबरोबरच उत्क्रांत

जीवनाच्या उत्क्रांतीला पूरक म्हणून मृत्यूची आवश्यकता सिद्ध झाली. अमरत्व हेही भडभुंजांचे आणि बडव्यांचे थोतांड समजावे.

उत्क्रांत मानवांना सूर्य आणि चंद्र दिसत होते पण सूर्य आणि चंद्राचा विचार करण्याइतकी उत्क्रांति होण्याला लक्षावधी वर्षांचा काल जावा लागला. मग 'काला' चा विचार त्याला कसा येणार! 'स्थल' आणि 'काल' यांचा उगम जीवन आणि विश्व उणे जीवन यांच्यामधील संबंधामध्ये आहे. फार काय? याच जीवन आणि विश्व उणे जीवन यांच्या संबंधामध्ये सर्व शास्त्रांचा कलांचा, विद्यांचा, धर्मांचा, संस्कृतीचा आणि परमेश्वर तत्वांचा उगम आहे. सर्व बुद्धीचे मूळ याच संबंधांत आहे. उत्क्रांति नसणे म्हणजे तरी काय? 'जसेच्या तसे रहाणे,' काहीही कसलाही, कोठल्याही प्रकारचा बदल न होणे, म्हणजेच उत्क्रांति नसणे. कशालाही, कोठल्याही प्रकारची, कोणत्याही दिशेने गति नसणे, म्हणजेच उत्क्रांति नसणे. आज आपण असे म्हणू शकतो की मनुष्याची उत्क्रांति होण्यापूर्वी विश्व–उणे–मनुष्य ह्यात होते. आणि हे तरी आपण कोणत्या आधाराने म्हणतो? एक व्यक्ती नष्ट झाल्यानंतर सबंध जग नि आपण जिवंत रहातो किंवा एक व्यक्ती जन्माला येण्यापूर्वी सबध जग आणि आपण अस्तित्वात होतो; हा आपला नित्याचा सेंद्रिय अनुभवच आपला बौद्धिक दृष्टया अखेरचा आधार नव्हे काय? बुद्धीचा उगमही आपल्या अनुभवांत आहे, आणि तिची वाढ आपल्या सेंद्रिय अनुभवांच्या वाढीबरोबर होत आलेली आहे आणि ही वाढ अशीच होत राहील.

विचार करण्यासाठी आपण एक दगडाचा तुकडा आणि त्यावर पडलेला एकच एक जीव गृहित धरू या, आणि हा दगड त्यावर पडलेला जीव हे विश्व समजू या. हा दगड आणि त्यावरील जीव यांना उत्क्रांति नाही ही गोष्ट मान्य केल्यानंतर कोणकोणती ज्ञानेय प्रमेये (अर्थात आपल्या आजच्या दृष्टीने) अनुमानिता येतील?

या गृहीत विश्वाला उत्क्रांति नाही म्हणजे काय? हा दगड जसाच्या तसाच रहाणार, त्या दगडामध्ये कसलाही, कोणत्याही प्रकारे, कसल्याही प्रकारचा बदल म्हणून होणार नाही. त्याचप्रमाणे त्या त्या दगडावरील जीवाचा फक्त श्वासोच्छवास तेवढा सुरू रहाणार, पण त्या जीवामध्ये

बदल म्हणून होणार नाही. आहे या स्थितीत बदल नाही, वाढ नाही, गति नाही, शरीराची वाढ नाही म्हटल्यावर मेंदूची आणि बुद्धीची वाढ तरी कोठून संभवणार! ज्ञानाचे तर नावच काढावायास नको. अमरत्व ते हे.

या दगडावरील जीव दगडाला चिकटलेलाच रहाणार. दगड आणि जीव यांच्याममध्ये भिन्नपणा असा कोणचा रहाणार? निरेंद्रिय दगड निर्जीव आहे–सेंद्रिय जीव दगडाप्रमाणेच रहाणार. अशा स्थितीत जीवाला 'काल' नाही, 'आज' नाही आणि 'उद्या'ही नाही. त्याचप्रमाणें त्याला 'मागे-पुढे पणा, 'वर खाली–पणा' किंवा 'आजू बाजूपणाही' असणार नाही. या गृहीत विश्वाला स्थलांतर नाही; त्याचप्रमाणे कालांतरही नाही. अशा जीवाला भाषा नाही. शास्त्रे नाहीत, कला नाहीत.

अखिल विश्व उत्क्रांतिमय आहे या गृहिताला सर्व भौतिक शास्त्रांचा पाठिंबा आहे; आणि या गृहिताच्या सत्यतेचा सर्व भौतिक शास्त्रे अधिकाधिक स्पष्ट रीतीने पाठपुरावा करीत आली आहेत; एवढेच नव्हे तर या गृहिताच्या आधाराने सर्व भौतिक शास्त्रे विश्वाशी अधिकाधिक सहकार्य करण्याच्या कामी अधिकाधिक प्रगत होत जात आहेत.

दगड आणि त्यावरील जीव याचाच विचार करू या. समजा, दगडावर एक झाड अस्तित्वात आले; आणि वाढीस लागलेला जीव हिंडू फिरू लागला दगडावरील जीवाच्या आयुष्यात त्याला खालील गोष्टी समजण्याची शक्यता वरील उत्क्रांतीने निर्माण झाली.

अ) दगड आणि जीव यांतील भिन्नता

ब) दगड, झाडे, आणि जीव यांतील भिन्नता

क) दगडामधील वाढ, किंवा अधिकपणा

ड) आधी, आता, आणि नंतर या विचारांची झाडाच्या अस्तित्वामुळे निर्माण झालेली शक्यता.

वरील प्रमेयावरून 'स्थलाच्या' आणि 'कालाच्या' अर्थाचा स्पष्ट बोध होणे सोपे होते.

१) स्थल किंवा काल ही सनातन, भिन्न आणि स्वतंत्र तत्त्वे, किंवा सत्यें नव्हत.

२) स्थल आणि काल या विश्वाला जखडून टाकणाऱ्या मर्यादा अथवा बंधने नव्हेत.

३) तर बदलणाऱ्या विश्वाच्या बदलत्या स्वरूपाचे योग्य आकलन होण्यासाठी मानवांनी विश्व-बदलासंबंधी केलेल्या वैचारिक कल्पना (Abstractions) आहेत.

४) स्थल आणि काल ही उत्क्रांतिशील विश्वाची क्रियात्मक स्वरूपे आहेत.

५) विश्वाव्यतिरिक्त आणि विश्वाबाहेर स्थलाला आणि कालाला अस्तित्व नाही.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होईल की, तत्वज्ञानी भडभुंजे आणि बडवे सांगतात तो स्थलाचा आणि कालाचा अर्थ खरा नाही. वैश्विक बुद्धीला-मानवी विश्व घटकामध्ये उत्क्रांत होत जाणाऱ्या बुद्धीला–विश्वामधील घडणाऱ्या बदलांचे विश्वनियमांच्या सहाय्याने आकलन करता येते, एवढेच शाश्वत सत्य तूर्त आपल्या हातास लागते.

मग विश्वा-पलीकडील सनातन, शाश्वत, परमेश्वर तत्त्वाचे आकलन थोतांड-वादी बडव्यांच्या शुद्ध बुद्धीला कसे होते !' हे भडभुंजे नेहमी असा दृष्टांत देतात की जलातील माशाला जलापलीकडे विश्व नाही; पण जलाबाहेर झेप घेऊन माशाला जलाबाहेरील विश्वाचे दर्शन होते. अगदी त्याचप्रमाणे शुद्ध बुद्धीच्या सहाय्याने एकादाच हजारो वर्षांच्या कालांत विश्वापलिकडील परमेश्वर तत्त्वाकडे झेप घेतो, आणि त्यालाच परमेश्वर तत्त्वाचा साक्षात्कार होतो. हजारों वर्षांत आणि कोटयावधि माणसांत एकादाच महामुनि असा निर्माण होतो. त्यानंतर हे बडवे दुसरा उपसिद्धांत माडतात की, परमेश्वर तत्त्वाचे ज्ञान झालेल्या महामुनीला विश्वनियमाचे ज्ञान म्हणजे नुसता हातचा मळ आहे. अशा महामुनीच्या हातांत क्षणार्धांत मानवी विष्ठेची शर्करा बनते, मात्र विष्ठा हवी, श्रद्धा हवी आणि बुद्धीचा माज असता कामा नये.

माशाने जलाबाहेर घेतलेली झेप सदेह आहे. कोणता महामुनी विश्वापलीकडे सदेह झेप घेऊन परत विश्वामध्ये आलेला आहे ? पृथ्वीच्या

काल्पनिक भटाला लागलेला नाही; मग त्याच्या वाढीचे, चढ-उताराचे, फेरफाराचे नियम आणि नियमन अशा कादंबरीमय वातावरणांत गुंगणाऱ्या भंगट बडव्यांना कळण्याची शक्यता देखील संभवत नाही. समजा, दहा हजार चौरस मैलाच्या प्रदेशावर एक मानव समूह वस्ती करून रहात आहे. स्वतःच्या संरक्षणासाठी समूहातील काही व्यक्ती बाजूस काढून तेवढ्याच कामासाठी त्यांची नेमणूक केली तर संरक्षण क्षमता वाढत जाते आणि याच तत्त्वानुसार क्षत्रिय वर्ण निर्माण झालेला दिसतो. समूह जीवनाच्या प्रथमावस्थेंत प्रचलित अर्थानें क्षत्रिय वर्ण नव्हता. ही गोष्ट नजरेआड कधींही करूं नये. समूह संरक्षणाच्या कार्याचे मार्गदर्शन करणाऱ्यांना समूह–जीवनातील इतर सर्व प्रकारच्या साथीदारांबरोबर प्रसंग–विशेषी कार्य करावे लागे. जरूरीप्रमाणे व कुवतीप्रमाणे सर्वच जण सर्व प्रकारची कामे करीत.

समूहाची लोकसंख्या वाढू लागल्यावर आणि मूळचा भूमि-प्रदेश अपुरा झाल्यावर समूहातील काही लोक समूहातील सर्व आचार-विचार घेऊन लगतचा भूमिप्रदेश जरूरीप्रमाणे आणि शक्यतेप्रमाणे व्यापू लागले. लोकसंख्येच्या वाढीबरोबर एका समूहाचे अनेक उपसमूह होत गेले.

(अपूर्ण)

## पुरस्कार : नारायण देसाई

आजवर मानवांना जीवनासाठी जे करावे लागले व जे करावे लागते आहे ते सर्वप्रथम काय असते ? व ते प्रामुख्याने काय असते ? शुद्ध ज्ञान ? निर्विकल्प समाधी ? सविकल्प संभोग ? की जीवनार्थ कृती ? जीवन संघर्ष-जीवन कलह ?

तसेच जीवनार्थ कृती, शुद्ध वैयक्तिक कधी असू शकेल काय ?

व्यक्तीला वाऱ्यापावसापासून निवारणार्थ एकट्याला घर बांधता येईल काय? बारा महिने एकट्याला जंगलांत किंवा समाजात भक्ष्यान्न कधी मिळेल काय ? तेव्हां समाजबाह्य चिंतन हे मुळांतच अवास्तव, असत्य चिंतन नव्हे काय ?

मार्क्सपूर्व कालांतील चिंतनाने या मूलभूत प्रश्नांची खऱ्याखुऱ्या जिवंत जीवनव्यवहाराला सोडून असलेली उलटसुलट नाना उत्तरे दिलेली आहेत. कोणी जगाच्या प्रारंभी शब्दालाच कर्ताधर्ता कल्पिले आहे, तर कोणी ब्रह्माला मानले आहे. कोणी आणखीन काय नि आणखीन काय. खराखुरा घडलेला व घडत असलेला मानव संघर्षाचा इतिहास त्या उत्तरामध्ये अभावानेंच आढळून येईल ! मानव वास्तवांत, व्यवहारात करतो–करू पहातो काय व त्याला चिंतन सांगते शिकवते काय ! तर भलतेच ! तथापि, मानवी चिंतनाची जी काय उत्क्रांती होऊ शकली आहे ती, व दुसऱ्यांच्या कर्मांवर ( श्रमांवर ) जगून, किंवा तशा प्रकारच्या शोषणातून पोषण घेऊन, चिंतन करणाऱ्या परोपजीवी वर्गाच्या चिंतनाचा पक्षपाती स्वभाव ह्या दोन्ही गोष्टींचे भान राखून, तत्वज्ञानाचा अभ्यास करणारास मानव हा सर्वप्रथम आणि प्रामुख्याने कृतिशील व गतिशील प्राणी आहे हेच उत्तर त्या संचित तत्वज्ञानातही सापडते.

ह्या वस्तुस्थितीचे पहिले कारण म्हणजे सत्य ही गोष्टच अशी आहे की शोषक शासक वर्ग व पुरोहितशाही यानी मूलभूत सत्य कितीही व कसेही दडपून टाकण्याचा प्रयत्न केला तरी सत्य स्वयंगतीने प्रकाशमान होतच असते व दुसरे कारण म्हणजे कोणत्याही देशाच्या संस्कृतीमध्ये लेनिनने म्हटल्याप्रमाणे शोषकांबरोबर बहुसंख्य शोषितांचाहि काही वाटा हा असतोच.

बायबलने जगाच्या प्रारंभी शब्द किंवा चित् मानले असले तरी बायबलच्या शिकवणूकीत जो काय सत्वपूर्ण अल्पांश आहे तो ख्रिस्ती चिंतनाच्या कर्ममार्गांमुळेच, किंवा समाजात ख्रिस्ती धर्मसंघटनेचे जे थोडेबहुत कृतीशील समाजसुधारक कार्य चालते त्यामुळेच आहे. त्यांच्या प्रभुचिंतनमुळे खास नव्हे. वास्तविक बुद्ध, ख्रिस्त आदि धार्मिक आंदोलनांच्या प्रारंभिक काळात दलित शोषित जनतेचाच त्या आंदोलनावर विशेष प्रभाव होता. इसलामची प्रारंभिक कहाणी काहीशी वेगळी असली तरी सर्वसाधारणपणे दलित जनतेचा वाटा त्यांतही काही कमी नव्हता. तीच गोष्ट भारतीय चिंतनाचीही आहे. भारतीय चिंतन सकृद्दर्शनी कितीही कल्पनावादी, आत्मवादी, मायावादी, परलाकवादी वगैरे वाटले व बहुधा बहुजनांच्या श्रमांवर जगणाऱ्या वर्गाच्या ते आहारी गेलेले असले तरीही कर्ममार्ग व मानवतावादच त्या चिंतनाचाही निष्कर्ष आहे. ऐहिकता हीच त्या चिंतनाचीही फलनिष्पत्ती प्रकाश सर्व काही आहे. 'कार्यवानेषु ब्रह्मविदां वरिष्ठाम' असेच ते तत्त्वज्ञान शिकवते.

युरोपीय चिंतनामध्ये महाकवी गटे यानी जगाचा आरंभच मुळी कृतीने–कार्याने सांगितला आहे. मानवाची प्रारंभिक जीवनधारक, जीवन उभारक कृती ही संभोगातून समाधीची नव्हती, किंवा निरंजन शांतीची नव्हती. ती उदरंभरणासाठी हजारो वर्षे प्रकृतीशी संघर्ष करण्याची होती, ह्यात तिळमात्र संशय नाही. जीवन संघर्षाच्या अनुषंगानेच मानवामानवांतील परस्पर सहकार्य, अंतर्गत संगठन आणि अंतर्विरोधही ठरत गेलेले आहेत व तशाच परिस्थितींत मानवांचा चिंतनात्मक पिंड विकसित होत गेला आहे.

आजवरच्या मानवाचा बौद्धिक, भावनात्मक, विचारात्मक, नैतिक पिंड जो बनत गेला आहे तो एका बाजूला प्रकृतीशी संघर्ष व दुसऱ्या बाजूला

सामाजिक संघटनेतील अंतर्विरोध या दोन धाग्यांनी विणला गेला आहे. तसेच मानवांचा प्रकृतीशी आणि सामाजिक संघटनांतर्गत जो जीवनसंघर्ष चालू असतो तो सरळसोट, एकांगी व एकविध नसतो. तो द्वंद्वात्मक असतो. म्हणजे एका बाजूने तो विरोधात्मक तर दुसऱ्या बाजूने तो ऐक्यात्मक असतो.

मानव आपल्या सुखासाठी निसर्गाला बदलतो तो संघर्ष करूनच बदलतो आणि ती बदलती परिस्थिती फिरून मानवाला बदलते. माणूस जंगले तोडतो. वसाहती स्थापन करतो. व वसाहती जीवन माणसाला बदलते. प्रकृती आणि समाजाच्या ह्या अन्योन्य क्रिया प्रतिक्रियांच्या प्रक्रियेमध्ये मानव प्रकृतीचे नियम शोधून काढून त्या नियमाप्रमाणे प्रकृतीला बदलत असल्यामुळे दुसऱ्या बाजूने तो निसर्गाबरोबर ऐक्यात्मक संबंधही प्रस्थापित करीत असतो. म्हणजे प्रकृतीला बदलणे हा संघर्ष तर प्रकृतीचे नियम जाणून घेणे व त्यानुसार प्रकृतीबरोबर रहाणे हे ऐक्य आहे.

थोडक्यात म्हणजे प्रकृती, व्यक्ती आणि समष्टी यांच्या अशा प्रकारच्या सुखदुःखात्मक व्यवहाराचे बौद्धिक मानसिक प्रतिबिंब म्हणजे माणसांचे तत्वज्ञान व संस्कृती होय. माणसांचे हे तत्वज्ञान व माणसांची ही संस्कृती संपूर्णपणे विश्वांतर्गत आहे. खुद्द परमेश्वर कल्पना ही सुद्धा विश्वांतर्गतच आहे. वास्तविक ती व्यवहारांतर्गतच कल्पना आहे.

दिवंगत रामचंद्र श्री. भागवत यानी प्रस्तुत पुस्तिकेत मानवाच्या बुद्धिव्यापाराचे मूळच आपल्या नजरेसमोर ठेवले आहे. गीतेमध्ये सत्यवृक्षाचे मूळ वर आहे असे जे म्हटले आहे ते भागवतांच्या तत्व प्रतिपादनांतील स्पष्टता पाहून अगदी खरे वाटते. कारण तसे नसते तर तत्वज्ञानाचे गुह्य भागवताना इतके स्पष्ट करून कसे बरे दाखवता आले असते ?

प्रस्तुत पुस्तिकेतील विवेचनात मूलभूत प्रश्नाला हात घालून उत्तरे देण्याचा केलेला प्रयत्न ही भागवतांच्या अभिजात प्रज्ञेची अमर साक्ष ठरलेली आहे. कालप्रवाह कितीही वाहून गेला तरी भागवतांना अभिप्रेत असलेले सत्य नेहमीच उज्ज्वल साक्षात्कारी सत्य म्हणून माणसांचे मार्गदर्शन करीत राहील. प्रस्तुत पुस्तिकेच्या वाचनाने वाचकाची तत्वज्ञानविषयक जिज्ञासा जशी जागृत होते तशीच आपल्या जीवनाकडे पहाण्याची त्याची

दृष्टी शास्त्रशुद्ध बनत जाते व सत्याजवळ पोहोचल्याचा त्याला एक प्रकारचा आत्मानंदही प्राप्त होतो.

शास्त्रे-विज्ञाने ही दिव्यासारखी आहेत. ती अंधार नाहीसा करतात. पण अंधार पाहू मात्र शकत नाहीत. अंधार पहाण्याचे काम विज्ञानाच्या दिव्याचा उपयोग करणाऱ्या वैज्ञानिक तत्वज्ञाचे असते. खरे म्हणजे युगाला पुढे नेणाऱ्या तत्वज्ञाचे असते. म्हणेजच क्रांतीचा प्रकाश मिळालेल्यांचे असते. खरे क्रांतिकारी तत्त्वज्ञान हा असा अंत:प्रकाश असतो. तर विज्ञानाचा पल्ला ह्या बाबतींत मर्यादित असतो.

कांही विचारवंत माणसाला नेऊन सरळ विश्वांत उभा करून तो आणि विश्व असा त्याचा प्रारंभिक अन्यीन्य संबंध लावून देतात. बहुतेक गणीत शास्त्रज्ञ, खगोलशास्त्रज्ञ व इतर विज्ञानवेत्तेही अशा प्रकारे माणसाला व्यर्थ भ्रमात पाडीत असतात. जणू काय विश्वांत खडा असलेल्या त्या मनुष्याला मानवतेचा वारसा, जीवन व्यवहार किंवा जीवन व्यवहारात्मक वस्त्रे नसून तो अगदी नागडा उघडाच विश्वांत सांपडला आहे. अर्थात विश्वांत खडा असलेला असा शून्योबा विश्वाच्या त्या अथांग पोकळींत परमेश्वराच्या नावाने नाही बोंबलणार तर दुसरे काय करणार ? अधिक तर बुर्झ्वा अस्तित्ववादाच्या नावाने शून्यवाद तो स्वत:वर लादून घेईल ! सर्व शून्य ! सर्व शून्य ! कर्म, व्यवहार, समाज, माया ममता, निष्ठा, नीती, न्याय सर्व शून्य हीच त्याची परिणती होऊ शकते.

म्हणून मूलभूतपणे विचार करण्याची प्राथमिक प्रारंभिक आवश्यक परिस्थिती प्रथम समजून घेणे आवश्यक असते. वास्तवांत ही परिस्थिती म्हणजे जीवनसंघर्षाचा सामाजिक व्यवहार, सामाजिक कर्ममार्ग, त्याचा इतिहास आणि त्याचे नियम. प्रकृती, व्यक्ती आणि समाज यांच्या क्रिया-प्रतिक्रियांच्या प्रक्रियेत ती परिस्थिती व तो इतिहास तयार झालेला असतो. व ह्या परिस्थितीतूनच मनुष्याचे अथांग विश्व जाणण्याचे सामर्थ्य किंवा त्याची तत्वज्ञानात्यक दुर्बिण त्याला योग्य तो विश्वाचा बोध देऊ शकते.

अन्यथा एका बाजूला परमेश्वराच्या नावाने व दुसऱ्या बाजूला सर्वशून्यतेच्या नावाने त्याच्या पदरात भ्रमाचा भोपळाच पडणार. म्हणून

समाजांतर्गत व युगांतर्गत ज्ञानविज्ञानाची शक्ती असल्याविना विश्वाच्या पोकळीत बसून व्यक्ती चिंतन ते काय करणार व कशाचे करणार ? दिवंगत भागवतांच्या लेखणीतून जे तत्वविवेचन प्रस्तुत पुस्तिकेत उतरले आहे त्याचे मुख्य वैशिष्टच म्हणजे ते माणसाला भ्रमातून तर वाचवतेच पण ते विवेचन माणसाला माणुसकी प्राप्त करून देणाऱ्या सामर्थ्याच्या दिशेने कार्यप्रवृत्त करते.

या उभ्या जगांत मार्क्सवादी, लेनिनवादी तत्वज्ञानच माणसाला माणुसकी प्राप्त करून देण्यास समर्थ असलेले तत्वज्ञान आहे. मानवजातीला या युगांत पुढे नेणारा मानवजातीचा तो युग प्रकाश आहे. अर्थात, तच हा युग प्रकाश ह्या युगाच्या ज्ञानविज्ञानाविना असंभव होता. तथापि तो या युगाच्या ज्ञानविज्ञानाहून अधिक दिव्य अंतःप्रकाश आहे.

दिवंगत भागवत यांना हा दिव्य अंतःप्रकाश दिसलेला होता. ते स्वतः अंतःप्रकाशित व्यक्तिमत्व होते. वास्तविक हा अंतःप्रकाश वस्तुगत रीतीने दिसणारा प्रकाश असतो. पण खऱ्या प्रकाशाची प्रकृतीच अशी दुहेरी असते की वस्तुगत वस्तुस्थितीबरोबरच तो आत्मप्रकाशही बनतो. प्रस्तुत पुस्तकांतील भागवतांचे गाळीव तात्विक सारतत्व वाचताना त्यांच्या आत्मप्रकाशाचा पदोपदी प्रत्यय येतो. या पुस्तकाच्या वाचन मननाने वाचक अधिक सजीव, अधिक मानवी, अधिक तेजयुक्त व प्राप्त ऐतिहासिक परिस्थितीतील आपले राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, सामाजिक व वैयक्तिक कार्य पार पाडावयास अधिक तत्पर बनल्याशिवाय रहाणार नाही.

वर्सोवा–मुंबई

नारायण देसाई

२२३५५
REFBK-0022355

## नवीं वैचारिक 'अभिनव' प्रकाशने

| | |
|---|---|
| श्री. अ. डांगे | |
| बारा भाषणे | १५-०० |
| इतिहास कोण घडवितो | ३-०० |
| लालजी पेंडसे | |
| धर्म की क्रांति | ५-०० |
| (शिवकार्याचे वास्तवरूप) | |
| शरचंद्र मुक्तिबोध | |
| जीवन आणि साहित्य | ६-०० |
| (वाङ्मयीन टीकालेख) | |
| वसंत शिरवाडकर | |
| ग्रह आणि आग्रह | १२-०० |
| (वाङ्मयीन टीकालेख) | |
| डॉ. सुरेंद्र बारलिंगे | |
| सौंदर्याचे व्याकरण | २०-०० |
| (सौंदर्य-कला-रस-मीमांसा) | |
| नारायण देसाई | |
| लेनिन आणि आपण | १५-०० |
| दुनिया बदलणारी साठ वर्षे | ८-०० |
| प्रभाकर वैद्य | |
| वल्लभभाई पटेल | ३०-०० |
| (एक परखड मूल्यमापन) | |
| त्र्यं. वि. पर्वते | |
| भारताचा सच्चा मित्र | ६-०० |
| गो. द. साने | |
| सोवियेत शेती व शेतकरी | १०-०० |

अभिनव प्रकाशन मुंबई-१४.

मानवी बुद्धीची झेप पहाण्यास तुम्ही तुमच्या परमेश्वर-तत्त्वापासून एकादा वर मागून घ्या. साठ हजार वर्षे जगण्याचा वर देवाने या भडभुंजांना आणि बडव्यांना देण्याचे देखील कारण नाही. आणखी वीस पंचवीस वर्षे जरी जगलात तरी बस्स आहे. पण जगा म्हणजे झाले. हिटलरसारखी आत्महत्त्या करू नका, किंवा भेकड मुसोलिनीप्रमाणे मरणाला कवटाळू नका. विश्वाच्या भौतिक उत्क्रांतीचे नियम मानवी बुद्धीला जसजसे उमगत जातील, तसतशी मानवी बुद्धि विश्वाशी सहकार्य करून विश्वापासून स्वतंत्र होत जाईल. चंद्राप्रमाणे पृथ्वी थंडगार पडली तर त्या वेळचा मानवी समाज दुसऱ्या एका ग्रहावर वस्तीसाठी जाईल. तुमच्या साठ हजार वर्षे तपश्चर्या करणाऱ्या ऋषि-मुनींची पुढील उत्क्रांतीशील समाज-निष्ठ-मानवाचे जोडे उचलण्याची देखील लायकी नाही.

आता स्थल-कालातीत शुद्ध बुद्धीतील स्थलाचा आणि कालाचा विचार करू या. भडभुंजांच्या आणि बडव्यांच्या तत्त्वज्ञानी दृष्टीने पहाता 'काल' ही एक स्वतंत्र अफाट नि अमर्याद चीज आहे. या कालामध्ये वैश्विक घटना परमेश्वर तत्त्व स्वेच्छेनुसार हळूहळू मानवांना उकलून दाखवीत आहे. परमेश्वर तत्त्वाच्या लहरीनुसार विश्व घटना कालामध्ये मागे जातात, थबकतात; पुढे जातात, पुन्हा मागे जातात; किंवा लुप्त होतात. विश्वाला कालाच्या आणि स्थलाच्या मर्यादेत राहून परमेश्वर तत्त्वांच्या लहरीं-प्रमाणे तेच ते चक्र फिरावे लागते.

उत्क्रांति नसेल तर जीवन अशक्य होते. जीवनांतून मानवी अस्तित्व उत्क्रांत होत आलेले आहे; पण विश्वोत्क्रांतीचे तत्व एकदा अमान्य केल्यावर मानवी अस्तित्वही नाकारावे लागते. मानवी अस्तित्व नाकारल्या-नंतर मानवी क्रियेचा, मानवी बुद्धीचा आणि मानवी समाजाच्या अस्तित्वाचा विचार तरी कोण करू शकेल? दगड दगडच राहिल्यानंतर त्याला सूर्याचे आणि उष्णतेचे किंवा थंडीचे ज्ञान होईल हे थोतांड नव्हे काय?

विश्वामध्ये जीवन उत्क्रांत झाल्यानंतरच म्हणजे जीवनाच्या उत्क्रांती-बरोबरच सूर्य आणि चंद्र किंवा उष्णता आणि शीतलता या अनुभवांची उत्क्रांति झाली. मृत्यूतून जीवनाचा उदय झाला; आणि त्याबरोबरच उत्क्रांत

पोपट मनुष्याची भाषा बोलू शकतो, आणि समजूही शकतो. सामुदायिक साहचर्य, सामुदायिक क्रिया-प्रतिक्रिया, निसर्गाशी सुरू असलेला सामुदायिक झगडा यांच्यामुळेच मनुष्याच्या गळयाची उत्क्रांति झाली, आणि भाषेचा जन्म झाला. भाषेमुळे मनुष्याच्या विश्वाबरोबर होणाऱ्या क्रिया-प्रतिक्रिया अधिकाधिक विकसित होत गेल्या, आणि विकलित होत जाणाऱ्या क्रिया-प्रतिक्रियांमुळे भाषाही विकसित होत गेली भाषेला समर्थ आणि स्वतंत्र साधनाचे स्वरूप आले; पण या सामर्थ्याचे आणि स्वातंत्र्याचे मूळ दृष्टिआड करून चालणार नाही. भाषेला स्वयंभूपणा नाही; तिचा स्वतःचा असा वेगळा संसार नाही; ती कायमची मनुष्य आणि विश्व यांच्यामधील परस्परांवर होणाऱ्या क्रिया-प्रतिक्रियांशी संलग्न आहे. संस्कृत भाषा कां मेली हें यावरून कळणे सोपे होईल.

मानवी समूह जीवन-रक्षणासाठी कृषिवर्धनाकडे आणि पशुवर्धनाकडे वळल्यानंतर त्यांच्या जीवनक्रियेला स्थायिकत्व प्राप्त झाले; त्याचबरोबर त्यांचे संचार-स्वातंत्र्य नष्ट झाले; पण नवीन प्राप्त झालेल्या स्थायिकतेमुळे मनुष्य-समूहांच्या उत्क्रांतीला अधिक वाव व गति प्राप्त झाली; त्याचप्रमाणे त्याच्या निसर्गाबरोबर झालेल्या स्थिर दोस्तीमुळे त्यांना निसर्गाचे अधिकाधिक ज्ञान प्राप्त होण्याची शक्यता निर्माण झाली. देश आणि राष्ट्र यांची संभाव्यता उदयास आली.

सामुदायिक शेती, समूह-रक्षण आणि सामुदायिक शेतीचे रक्षण या व इतर अनेकविध क्रिया सर्वच्या सर्व समूहाला करणें गैरसोयीचे होऊ लागले, त्यामुळे मानवी समूहामध्ये समूह–निष्ठ श्रम–विभाजन करणे अत्यावश्यक झाले. समूह–निष्ठ श्रम–विभाजनाचा अर्थ असा की समूहातील एक किंवा अनेक व्यक्ती जे अन्नोत्पादन कार्य किंवा अन्नोत्पादन–पोषक कार्य करीत होत्या ते अन्नोत्पादन कार्य किंवा अन्नोत्पादन पोषक कार्य समूहाच्यासाठी होत होते; आणि अशा उत्पादनांतील भाग व्यक्तीला मागाहून तोडून दिला जाई. गरजेनुसार उद्भवलेल्या श्रम–विभाजनाचे फायदे असे दिसू लागले की श्रमविभाजनावर आधारलेले कार्य अधिक फलदायी होते; हे अधिक फायदे दिसून आल्यावर समूहामध्ये श्रम-विभाजनाची अधिकाधिक वाढ होत गेली. हा श्रम-विभाजनाचा साक्षात्कार गुहेत चिंतन करणाऱ्या